# श्रीसाई लीला



साई निकेतनमधील श्री साईबाबा मूर्ती

मूल्य

## श्रीसाई बाबांच्या जागतिक मंदिरातील

# ❀ मूर्तींच्या छायाचित्रांचे अपूर्व प्रदर्शन ❀

### मंदिर चालकांना आग्रहाची विनंती

श्रीसाईबाबांच्या साठाव्या महानिर्वाण पुण्यतिथीच्या निमित्ताने शिरडी येथे अगदी नजिकच्या काळात एक अपूर्व प्रदर्शन भरविण्यात येत आहे.

श्रीसाईबाबांची भारतात ठिकठिकाणी नव्हे तर जगातही मंदिरे आहेत. या मंदिरातून कुशल शिल्पकारांनी बाबांच्या विविध प्रकारे घडविलेल्या नयनरम्य अशा मूर्ती स्थापन केलेल्या आहेत. अनेक चित्रकारांनी आपल्या कुंचल्यातून बाबांच्या रेखीव सुंदर प्रतिमा चितारलेल्या आहेत. अशा या मूर्तींच्या व चित्रांच्या छायाचित्रांचे अपूर्व असे प्रदर्शन भरविण्याचे संस्थानने योजिले असून साईभक्तांना हे अभूतपूर्व प्रदर्शन पहाण्याची एक दुर्मिळ संधि लाभणार आहे.

श्रीसाईबाबांच्या जगातील ठिकठिकाणच्या मंदिर चालकांनी आपल्या मंदिरातील बाबांच्या मूर्तीची किंवा प्रतिमांची छायाचित्रे या प्रदर्शनासाठी पाठवून संस्थानला संपूर्ण प्रकारे सहकार्य करावयाचे आहे. या प्रदर्शनात भाग घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची फी आकारण्यात आलेली नाही. मंदिर चालकांनी आपापल्या मंदिरातील मूर्तीचे किंवा प्रतिमेचे छायाचित्र २५ सेंटीमीटर लांब ( १० इंच ) व २० सेंटीमीटर रुंद ( ८ इंच ) या मोजमापात शक्य तर पिवळसर किंवा क्रीम रंगाच्या माऊंटवर चांगले चिकटवून पाठवायचे आहे. मंदिरात बाबांच्या एकाहून अधिक मूर्ती किंवा प्रतिमा असतील तर त्यांची सुद्धा याच मोजमापात छायाचित्रे माऊंटवर बसवून पाठवावीत. काचेच्या फ्रेमस् अजिबात पाठवू नयेत. सर्व चित्रांच्या मागे, चित्रातील मूर्ती कोणत्या मंदिरातील आहे, ती किती फूट उंचीची आहे, तिचा शिल्पकार कोण, चित्रकार कोण, केव्हा स्थापन केली याचा निर्देश असावा.

सर्व छायाचित्रे उशिरात उशिरा **१५ ऑक्टोबर १९७८** पर्यंत श्री. संपादक श्रीसाईलीला, 'साई निकेतन', ८०४ बी, दादासाहेब सर्कल, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ या पत्त्यावर व्यवस्थित पाठवावीत.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्रीसाई वाक्सुधा

साईबाबा महासंत ।
धीर उदार आणि दान्त ।
यात्रेकरूंसी कृपावंत ।
पैसे अत्यंत वांटिती ॥ ४ ॥

दिडक्या चवल्या हाताचा कीस ।
अधेल्या-पावल्यांचा पाऊस ।
रुपये दहा कोणास वीस ।
कोणास पन्नास ते देत ॥ ५ ॥

हे काय सुणासुदा दिसीं ।
कार्यविशेषीं कां पर्वकाळासी ।
प्रतिदिवशीं उक्त प्रमाणेंसीं ।
संतोषेसीं अर्पीस ॥ ६ ॥

पहुड येती भवय्ये नाचती ।
गवय्ये गाती भाट वानिती ।
तमासगीर मुजरे देती ।
भजनीं रंगती हरिभक्त ॥ ७ ॥

ऐसे महाराज उदारवृत्ति ।
दानधर्मी सढळ स्थिति ।
ऐकूनि कर्णोपकर्णी ही कीर्ति ।
इच्छा धरिती दर्शनाची ॥ ८ ॥

—श्रीसाईसच्चरित अध्याय २९ वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५७ वे ] जून १९७८ [ अं. ३

: संपादक :
श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
● डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
● श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६-०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका—जून १९७८


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | जगाला जागविण्यासाठीच संतांचा अवतार ! |
| २) | श्रद्धांजली | |
| ३) | उदी लावली व दुखणे साफ पळाले | —— |
| ४) | युगावतार श्रीसाईबाबा | — श्री. चंद्रकांत सामंत |
| ५) | श्रीबाबांची प्रभावी उदी | — डॉ. श्री. दि. परचुरे |
| ६) | श्रीसाईबाबांनी लग्न जमविले | — श्री. नंदकुमार खेले |
| ७) | माझा साईनामावरील विश्वास | — कु. जयश्री सप्तालकर |
| ८) | महान संत कलावती देवी | — श्री. एन. जी. परुळेकर |
| ९) | साईची अलौकिक कृपादृष्टी | — श्री. पां. वा. भुतकर |
| १०) | बान्द्यावरचे विचार | — श्री. द. शं. टिपणीस |
| ११) | श्रीसाई निकेतन मधील श्रीसाई मूर्तीची प्राणप्रतिष्ठा | — कु. रेखा दिघे |
| १२) | शिरडी वृत्त | —— |
| १३) | नमन तुजसी साईनाथा | — डॉ. शांताराम टिपणीस |
| १४) | साई लाज रखो | — प्रा. गुंडेराव पटवारी |
| १५) | मार्ग | — डॉ. इंदू नाईक |
| १६) | श्रीसाईस्तवन | — श्री. उदय नेवगी |
| १७) | श्रीसाई दयाघन | — श्रीमती शकुंतला मुंडले |
| १८) | श्रीसाई महिमा | — श्री. आर. जी. डुबल |
| १९) | विविध रूपात साई | — सौ. उषा अधिकारी |
| २०) | तोचि सद्गुरु साई | — श्री. शिवरामबुवा राणे |
| २१) | तूच त्राता साईनाथा | — श्री. सुधाकर जोशी |
| २२) | आता तारी सद्गुरु साई | — श्री. सुरेश सातपुते |
| २३) | मानसपूजा-श्रीसद्गुरु साईनाथांची | — श्री. विनायक देशपांडे |
| २४) | साईगाथा | — श्री. डी. बी. जगतपुरीया |
| २५) | बाबांच्या निर्वाणाचे दृश्य व त्यापासून घ्यावयाचा बोध | — श्री. अ. ज. चितांबर |

## संपादकीय—

स. नं. वि. वि.

### जगाला जागविण्यासाठीच संतांचा अवतार !

संत हे परमेश्वराचे बाह्य स्वरूप आहे. अंतरंगात त्यांनी कसा त्याला लपवून ठेवला आहे, हे शोधण्यासाठी भगवंतानी जग निर्माण केले आहे. ऐहिक उन्नतीची मनुष्यास जशी गरज आहे. तशीच पारमार्थिक उन्नतीचीहि गरज आहे. कितीहि खबरदारी घेतली तरी ऐहिक साधनांनी जे सुख उत्पन्न होते त्या सुखाने मनुष्याचे समाधान होत नाही. पूर्ण सुखासाठी त्याचा जीव तळमळत असतो. तारुण्यावस्था निघून गेली की, मनुष्याचा प्रापंचिक ओढा हळुहळू कमी होत जातो. सुखविलास भोगून कंटाळा आला किंवा ते भोगता भोगता त्यातूनच निरनिराळी अनेक संकटे किंवा दुःखे उत्पन्न झाली म्हणजे मनुष्याला पारमार्थिक मार्गाची जरूर भासू लागते. कितीहि मनुष्य ऐश्वर्यवान् असो, धनधान्य-संतती-संपत्ति यांच्या सुखाने तो परिपूर्ण दिसो, बाह्यरूपी तो कितीहि सुखी दिसला तरी त्याच्या अंतरंगातील सुखाची कल्पना त्याला जितकी असते तितकी इतराना नसते. सारांश, प्रत्येक मनुष्याला पारमार्थिक सुखाची गरज केव्हाना केव्हा भासतेच !

### परमार्थाची चार साधने

पारमार्थिक उन्नतीसाठी हिंदुधर्माने चार मुख्य साधने सांगितली आहेत. या साधनाना मोक्षमार्ग असे म्हणतात. **कर्ममार्ग, ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग** आणि **योगमार्ग** असे हे चार मोक्षाचे मार्ग आहेत.

कर्ममार्गात प्राचीन काळी यज्ञाचा समावेश केलेला होता. वेदप्रणित धर्म प्रथमतः प्रार्थना-पद्धतीचा होता. कालांतराने तो बदलत जाऊन त्यास यज्ञाचे स्वरूप प्राप्त झाले. "यज्ञोहि श्रेष्ठतमं कर्म" म्हणजे यज्ञ करणे हे अत्यंत श्रेष्ठ कर्म आहे. हा परमार्थातील पहिला **कर्ममार्ग** झाला.

दुसरा मार्ग म्हणजे **ज्ञानमार्ग** होय. "ज्ञानादेव मोक्षः न तु कर्मसमुच्चयात् !" पुष्कळ कर्में केल्याने मोक्ष मिळत नाही. तो ज्ञानाच्या योगानेच मिळतो. हे तत्व या मार्गाचे आहे. ज्ञानमार्ग ही पराविद्या आहे.

**"तत्रापरा ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्ववेदः । शिक्षाकल्पो**

व्याकरणं निरुक्तं छन्दो ज्योतिषमिति ॥ अथ परा यथा तदक्षरमधिगम्यते ॥

अर्थ :—ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद आणि त्यांची सहा अंगे–शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद आणि ज्योतिष. जिच्या योगाने अविनाशी अशा ब्रह्मस्वरूपाचे ज्ञान होते ती (ज्ञानमार्ग) पराविद्या होय. इतका अभ्यास केल्याने हा परमार्थातील दुसरा **ज्ञानमार्ग** झाला.

## सर्वांना सुसाध्य मार्ग

तिसरा **भक्तिमार्ग.** हा मार्ग सर्वांनाच साधण्यासारखा आहे. ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम, रामदास, जनाबाई, एकनाथ, मुक्ताबाई, निवृत्ति, चोखा, पद्मनाभ वगैरे सर्व संतानी भक्तिमार्गाने मोक्ष मिळविला आहे.

चवथा **योगमार्ग.** या योगमार्गाची **यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान** आणि **समाधि** अशी आठ मुख्य अंगे आहेत.

## अभ्यासाची जरूरी

एकंदरीत मोक्षाला नेणारे हे परमार्थाचे मार्ग पूर्वीच साधुसंतांनी दाखवून दिले आहेत. यात लेखक स्वतःच्या पदरचे असे काहीच लिहू शकत नाही. प्रत्यक्ष भगवंतांनीसुद्धा अर्जुनाला हेच सांगितले आहे की, अर्जुना, तू नुसत्या चमत्काराला भुलून जाऊ नको व पोकळ बडबड करीत राहू नको, तर अभ्यास कर. त्याप्रमाणे तू आचरण कर. तुझे ते सद्वर्तन लोकानी पाहिले म्हणजे लोक आपोआपच त्या मार्गाने जातील. यद्यदाचरति श्रेष्ठ स्तत्तदेवेतरो जनः। "सयत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥" असा हा भगवंताचा शोध लक्षात घेऊन अर्जुनाने परमार्थमार्गाचा स्वतः अभ्यास केला तेव्हाच जगातील लोकाना आपल्या कल्याणाचा परमार्थ साधता आला.

## संतांचे कार्य

संत तुकाराम महाराजांनीसुद्धा हेच सांगितले, "कारण अभ्यास तुका म्हणे." जे भगवंतांनी सांगितले त्याच नियमाला धरून सर्व साधुसंत सांगणार. जगाला सदोदित जागृत ठेवणे हेच सत्पुरुषांचे कायमचे कर्तव्य ठरले गेले आहे. कलियुगा-

तील माणसाना चमत्कारकृतीने जागृत ठेवण्याचा उद्योग भगवंतांनी संतांना लावून दिला आहे. हेतु हाच की, ह्या ना त्या उपायानी जगातील सर्व माणसांनी आपले कल्याण करून घ्यावे. श्रीसाईमहाराज हे मुसलमान असोत अगर हिंदु असोत, आपण त्या ठिकाणी एकच पहातो ते काय, तर त्या ठिकाणी श्रीदत्तप्रभूंचे वास्तव्य आहे. ह्याच दृष्टीने आपण त्या ठिकाणी पहातो. जगातील लोक जेव्हा अगदी नास्तिक बनतात तेव्हा परमेश्वरालासुद्धा निरनिराळया रूपात राहून लोकांचे कल्याण करावयाचे असते. संत तुकाराम महाराज मंदिरात कीर्तन करीत असताना त्यांच्या घरी चोराने म्हैस चोरून नेली. महाराजांचा सर्व भार पांडुरंगावर होता; तेव्हा हे साकडे पांडुरंगावर पडले. चमत्कार असा झाला की, श्रीपांडुरंगाने निराळ्या वेषात येऊन त्या चोराना रस्त्यात अडविले व त्यांना चोप देऊन चोरून आणलेली म्हैस त्याना आणलेल्या जागेत बांधून ठेवण्यास भाग पाडले. शेवटी ते चोर तुकाराम महाराजांना शरण जाऊन आपल्या जन्माचे सार्थक करते झाले.

## दारूचे दूध झाले

अर्वाचीन काळातील सद्‌गुरु पद्मनाभ महाराजांचे उदाहरण देता येईल. ते असे—मांस खाऊ नका, दारू पिऊन गटारात पडून आपल्या संसाराचा नाश करून घेऊ नका, चोरी करू नका, जुगार खेळू नका, कर्जबाजारी बनू नका, असा लोकांना ते उपदेश करीत असताना लोकांना ते आवडले नाही. काही लोकांनी बेत करून त्यांना आमंत्रण केले की, “महाराज! कांदेवाडीत या, त्या ठिकाणी आम्ही बरेच लोक एकत्र जमून आपला मार्ग स्वीकारणार आहोत.” हे मतलबी आमंत्रण महाराजांना समजताच महाराज ठरलेल्या वेळी हजर राहिले. लोकांनी अगोदरच त्या ठिकाणी दारू व मटण आणून ठेविले होते. त्यांनी मद्यमांस खात नाही म्हटल्याबरोबर त्यांना बडवावयाचे, हे अगोदरच ठरले होते पण चमत्कार पहातात तो काय? महाराजांना लोकांनी सांगताच महाराजांनी होकारार्थी उत्तर देताच लोकाना नवल वाटले. चमत्कार असा झाला की, त्यापैकी एकाला महाराजांनी बोलावून सांगितले की, आणलेल्या मद्यमांसावर तुमचा कपडा टाका. थोड्या वेळाने त्यांना तो कपडा काढावयास सांगितले. पाहातात तो काय? दारूचे दूध झाले व मटणाची फुले झाली. नास्तिक बुद्धीने हातात दांडे, सोटे घेऊन आलेले लोक अगदी थंडगार होऊन आश्चर्याने चकीत होऊन श्रीपद्मनाभ महाराजांना शरण गेले व आपले कल्याण करून घेते झाले. असाच चमत्कार श्रीपद्मनाभ महाराजांचे सद्‌गुरु श्री देव मामलेदार यांनीही करून दाखविला असून जगातील लोकांचे कल्याण केले.

जे सरकारला कायद्याने करता येत नाही तेच साधुसंतांनी लोकांना चमत्कार दाखवून, त्यांना निर्व्यसनी करून ईश्वरभक्ती-मार्गात राहून आपले कल्याण कसे करून घेता येईल, प्रपंच साधून परमार्थ कसा साधता येईल यासाठी परमार्थमार्ग दाखवून दिला आहे.

**केनेषितं पतति प्रेषितं मनः। केन प्राणः प्रथमः प्रेति युक्तः॥**
**केनेषितां वाचमिमां वदंति। चक्षुः श्रोत्रं कत्र देवो युनक्ति ॥१॥**

अर्थ—मनाला थांबविणारा, प्राणाला जखडून टाकणारा, वाणीकडून वदविणारा, डोळे आणि कान ह्यांना राबविणारा कोण देव आहे ?

—जो कोणी आहे त्याच्या शोधार्थ जनता तपश्चर्या करीत आहे. पण मार्गदाता मिळाल्याशिवाय काय ? सर्वच अस्वस्थता. ही अस्वस्थता सद्‌गुरूला शरण गेल्यावरच दूर होणार आहे. शरीर आणि आत्मा यांचे जसे संबंध आहेत तसेच संत आणि परमात्मा यांचे आहेत. म्हणून **'संत दयाळू कसे, राजा-रंक जया सरिसे'** संतांसारखे दयाळु हे परमेश्वरस्वरूप आपल्याला लाभले म्हणजे खरोखरच आपल्या जन्माचे कल्याण करून घेता येईल. परंतु त्यांचा लाभ सर्वांनाच घडत नाही. ज्याना तो घडतो व ज्यांच्यावर त्यांची कृपा होते ते खरोखर धन्य होत !

★


**' मुलांचे साईबाबा ' चा**

**सरस हिन्दी अनुवाद**

**बच्चों के साईबाबा**

अनुवादक — **सदानंद चेंदवणकर**

दुसरी मोहक आवृत्ती विक्रीस तयार

**किंमत — ७५ पैसे.**

## श्रद्धांजली



श्रीसाईलीला मासिकाचे माजी संपादक प्रा. द. दि. परचुरे ह्यांना दि. १–६–७३ रोजी काळाने आपल्यामधून ओढून नेले त्या घटनेस आज पाच वर्षे पूर्ण झाली. प्रस्तुत मासिकाचे काम त्यांनी हाती घेतल्यापासून त्यांना एकच ध्यास लागला होता व तो म्हणजे त्यामध्ये सुधारणा घडवून आणणे व त्याचा प्रसार वाढविणे. प्रस्तुत मासिकाची सुरवात १९२३ साली झाली व तेंव्हापासून ते केवळ मराठीतच छापले जात होते, होता होता बाबांचे भक्त वाढत गेले. बाबांची कीर्ति दिगंतात पसरू लागली व कित्येक अमराठी भाषीय भक्तांना असे वाटू लागले की, आपण बाबांच्या कृपेपासून वंचित होत आहोत. ही गोष्ट लक्षात येताच प्रा. परचुरे ह्यांनी काही इंग्रजी लेख साईलीला मासिकात द्यावयाची सुरवात केली. त्यामुळे इंग्रजी भाषिकांना थोडासा दिलासा मिळाला ह्यात काहीच संशय नाही; परंतु ज्यांना निव्वळ इंग्रजी भाषाच अवगत आहे किंवा ज्यांना केवळ मराठी भाषाच अवगत आहे, त्यांना असे वाटू लागले की, आपणाला अवगत नसलेल्या भाषेच्या पानांचा भार आपल्यावर विनाकारण आहे. साईभक्तांची ही अडचण प्रा. परचुरे ह्यांच्यासारख्या चाणाक्ष संपादकाच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही आणि त्यांनी आपली ह्याबद्दलची योजना कोर्ट रिसीव्हर श्री. पाठकसाहेब यांचे पुढे विचारासाठी मांडली. ती योजना म्हणजे इंग्रजीमध्ये स्वतंत्र अंक काढणे ही होय. श्री. पाठकसाहेब हे नवीन योजनांचे स्वागत करण्यात फार तत्पर आहेत, हे त्यांच्या शिरडी संस्थानातील कारकीर्दीवरून सर्व भक्तांना माहीतच आहे. तेंव्हा त्यांनी या योजनेस तात्काळ संमति दिली व दोनही अंकांच्या संपादनाची संयुक्त जबाबदारी प्रा. परचुरे यांनी स्वीकारली व एप्रिल १९७३ ला स्वतंत्र इंग्रजी अंक सुरू केला! साईबाबांची पुण्याई, त्यांच्यावरील भक्तीचा प्रसार इत्यादि गोष्टी मासिकाच्या प्रचारास कारणीभूत आहेतच. मासिकाचे एप्रिल १९७३ ला मराठी ८०० व इंग्रजी ४०० अंक निघाले होते. ते आजमितीस मराठी २३५० व इंग्रजी ११२५ वर आलेले आहेत. मासिकाच्या या वाढत्या प्रसाराला श्रीसाईबाबांचे आशीर्वाद कारणीभूत आहेत हे खरेच; परंतु त्याचबरोबर द्रष्टे-

पणाने मासिकात काळाला अनुरूप असे बदल घडवून आणणाऱ्या प्रा. परचुरे यांच्यासारख्या संपादकाचाही ह्यामधील वाटा अमान्य करून चालणार नाही. मासिक चांगले निघावे, भक्तांच्या आकांक्षा पूर्ण करणारे निघावे एवढीच अपेक्षा प्रा. परचुरे यांनी ठेवली नव्हती तर दर एक तारखेला अंकाची उत्सुकतेने वाट पहाणाऱ्या भक्तांच्या हातात मासिक एक तारखेस पडलेच पाहिजे, याविषयीही त्यांचा कटाक्ष असे. यासाठी वेळप्रसंगी साईनिकेतन मधील कर्मचाऱ्यांस मासिके पोस्टाने पाठविण्यासाठी काही कारकुनी कामातही मदत करण्यास प्रा. परचुरे मागे पुढे पहात नसत. जून १९७३ चा अंक एकतीस मे ला पोस्टात पडण्यासाठी स्वतः प्राध्यापकांनी पत्ते लिहिले व वर्गणीदारांच्या यादीबरोबर पडताळून पाहिले होते ही गोष्ट एकतीस मे १९७३ ची आहे! आपल्या वाचकांसाठी अशा प्रकारे तळमळणारा संपादक विरळाच. त्यांच्या पाचव्या श्राद्धदिनी (दि. १-६-७८) आम्ही त्यांना श्रद्धांजली अर्पण करितो व सर्व साईभक्तांच्या वतीने परमेश्वरास प्रार्थना करतो की, त्यांच्या आत्म्यास चिरशांती प्राप्त होवो!

—संपादक


## 'मशिदीत प्रगटला परमेश्वर!'

अर्थात्

## शिरडीचे साईबाबा

चमत्कारातून नमस्काराकडे नेणाऱ्या या महान अवतारावर एका सिद्धहस्त नामवंत महाराष्ट्रीय चित्रपट दिग्दर्शकाने लिहिलेली हृदयस्पर्शी कादंबरी!

बाबांचे चमत्कार, बाबांची शिकवण, बाबांचं साधं फकिरी जीवन, बाबांचं अध्यात्मिक तत्त्वज्ञान आणि पवित्र भक्ती-गंगाजलानं दुथडी वाहणारी अभिनव कादंबरी !

पृष्ठे ३६० ● प्रकाशनपूर्व किंमत रु. १८/-

**प्रकाशन : गुरुपौर्णिमा, २०, जुलै, १९७८**

भक्त-अभक्तांनी आपल्या हृदयात आणि संग्रहात ठेवण्याजोगा ग्रंथ !

व्यक्तिगत नोंदणी : **प्रशान्ति प्रकाशन,**
**९/१३, पिरामल नगर, गोरेगाव (पश्चिम)**
**मुंबई – ४०० ०६२**

# युगावतार श्रीसाईबाबा : १४

( श्रीसाईबाबा सत्संग मंडळ, सुरत ह्यांच्या सौजन्याने )

अनु :– श्री. चंद्रकांत दामोदर सामंत
डोंगरे मॅन्शन, ताडदेव, मुं. ७

• जन्माला आलेल्या प्रत्येक प्राणीमात्राला मृत्यु हा अटळ असतो. हे माहिती असुनही अज्ञानी मनुष्य आपल्या प्रिय व्यक्तिच्या मृत्युबद्दल परमेश्वराला किंवा संतांना दोष देताना आढळून येतो. जरी संतपुरुष किंवा महात्मे हे क्वचित प्रसंगी मरणाऱ्याला काही काळ जीवदान देऊ शकत असले तरी ते सहसा जन्ममृत्युच्या अव्याहत चालणाऱ्या नैसर्गिक रहाटगाडग्यात हस्तक्षेप करीत नाहीत. म्हणूनच सृष्टीच्या व्यवहारात नित्य घडत असलेल्या त्या जन्ममरणादि घटनांबद्दल परमेश्वराला दोषी धरणे उचित ठरत नाही. ह्या संबंधातील श्रीसाईनाथांच्या एका भक्ताचा अनुभव उद्‌बोधक आहे.

एका गृहस्थाचे वडिल श्रीबाबांचे निस्सीम उपासक होते. स्वतः अनन्यभावे श्रीसाईबाबांची सेवा करून बऱ्याच जणाना त्यांनी त्या मार्गाला लावले होते. वृद्धावस्थेत त्यांना पोटाची व्याधी जडली तेव्हा त्यांनी श्रीबाबांची नियमित प्रार्थना करून शक्य तेवढे वैद्यकीय उपचार केले. पण त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले व त्यातच त्यांचा अंत झाला. सर्व कुटुंबावर दुःखाची कुऱ्हाड कोसळली. सदर गृहस्थाच्या मनात विचार येऊन गेला की, "माझे वडील रात्रंदिवस श्रीबाबांचे स्मरण व सेवा करीत असतानाही श्रीबाबाना त्यांची दया कशी आली नाही ? मग मी तरी आता त्यांची भक्ति करून काय फळ मिळणार आहे ?" अहोरात्र ह्याच विचाराने ते पुरते नास्तिक बनले. एवढेच नव्हे तर श्रीबाबांची तसबीर, साहित्य वगैरे एकत्र गाठोड्यात बांधून ते समुद्रात सोडून द्यावयाचा विचार त्यांनी नक्की केला. बाकी काही फोटो वगैरे घरात शिल्लक आहेत का ते पाहण्यासाठी त्यांनी टेबलाचा खण उघडला. तेथे त्यांना "श्रीसाईसच्चरित्र" ह्या ग्रंथाच्या आत उदीची एक लहानशी पुडी दिसली. ज्या पानावर ती पुडी आढळली होती त्या पानातील मजकुरावर त्यांची नजर एक क्षणभर स्थिरावली. मनुष्यप्राण्याने जन्ममृत्युच्या समयी वृत्ति कशी स्थिर ठेवावी ह्याविषयी श्रीबाबांनी केलेल्या मार्गदर्शनाचे वर्णन तेथे होते व असल्या क्षुल्लक घटनाबद्दल परमेश्वराला दोषी न धरण्याबद्दल बजाविले होते. हा उपदेश वाचताक्षणीच त्या गृहस्थाचे प्रक्षुब्ध मन शांत झाले व श्रीबाबांनी वेळीच हा उपदेश केल्याबद्दल त्याने मनोभावे त्यांचे आभार मानले.

बऱ्याच प्रसंगी संतांच्या सानिध्यात राहणाऱ्या व्यक्तिंच्यासुद्धा मनात अविश्वास निर्माण होतो, पण कनवाळु संतमहात्मे आपल्या भक्तांच्या मनातील संभ्रम वेळीच ओळखून त्यांचे मन भक्तिमार्गावर कुशलतेने आणून सोडतात. ★

# उदी लावली आणि दुखणे साफ पळाले

● मुंबईत प्रभादेवीला समुद्रकिनाऱ्या जवळ सौ. मंदाकिनी इनामदार नावाच्या साईभक्त भगिनी राहातात. त्यांचे पती श्री. जी. आर. इनामदार हे पण अतिशय भाविक अंतःकरणाचे आहेत. ते रिझर्व्ह बँकेच्या वरळीच्या कृषी शाखेचे वरिष्ठ प्रशासन अधिकारी आहेत. ऑल इंडिया साई समाजाचे सध्याचे अध्यक्ष श्रीराधाकृष्ण स्वामीजी मुंबापुरीत आले की ते त्यांचेकडेच उतरतात इतकी त्यांच्यावर परमेश्वरीकृपा आहे.

एकदा सौ. इनामदारांच्या डोक्याच्या पाठीमागील भागात मानेजवळ खूप खूप दुखू लागले. सर्व प्रकारचे औषधोपचार केले, अनेक तज्ज्ञ डॉक्टर मंडळींच्या भेटीगाठी पण घेतल्या, बराच पैसाही खर्च झाला, क्ष किरणाने छायाचित्रे पण घेतली. पण छे ! गुण म्हणून नाही.

योगायोगाने अगदी याच वेळी श्रीराधाकृष्ण स्वामीजी त्यांचेकडे आले. इनामदार बाईनीं आपले दुःख स्वामीजींना सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळीच पूजा झाल्यावर स्वामीजींनी श्रीसाईबाबांची उदी घेतली व ती त्यांच्या पिडीत भागाला लावली. पुन्हा दोनचारदा उदीचा प्रयोग करण्यात आला.

आणि विश्वास ठेवा अगर ठेवू नका इतके दिवस अक्षरशः बेजार झालेल्या सौ. इनामदारना खडखडीत बरे वाटले. औषधपाणी नाही की गोळया इंजेक्शने नाहीत की काही नाहीत. अद्याप त्या चांगल्या आहेत. तेव्हापासून जरासुद्धा दुःख नाही.

— सदानंद

# श्रीबाबांची प्रभावी उदी

—डॉ. श्री. दि. परचुरे, एम. ए. पी एच. डी.
गजानन भुवन, शिवाजीपार्क, दादर, मुं. २८

* भारतातील कोठल्याही देवळात आपण गेलो तर दोन गोष्टी त्या देवळात आपणास दिल्या जातात. त्यातील एक म्हणजे प्रसाद व दुसरी गोष्ट म्हणजे अंगारा. भारतीय लोकांच्याही ते एवढे अंगवळणी पडले आहे की कोणत्याही मोठ्या क्षेत्राची यात्रा किंवा देवळाची भेट आटोपून मनुष्य आला की त्याच्याकडे येणारे लोक ह्या दोन गोष्टींची मागणी केल्याशिवाय रहात नाहीत. तसेच तीर्थक्षेत्रात जाणारा मनुष्य या दोन गोष्टी आवर्जून बरोबर घेतो व परत घरी गेल्यावर या दोन गोष्टी येणाऱ्या सर्व माणसाना आवर्जून मुक्त हस्ताने वाटतो. अंगाऱ्याचे हे महत्त्व तुकोबारायांनी ओळखून लोकांच्या त्यावरील विश्वासाला अनुसरुन असे म्हटले आहे की, " जब सरती भोग सारे तैं गुण येती अंगारें " भोग सरल्याखेरीज माणसाला कशानेही गुण येत नाही आणि माणसाचे भोग संपले की त्याला अंगाऱ्याने सुद्धा गुण येतो हे तुकाराम बोवांना सांगावयाचे होते. शिरडीला आपण गेलो म्हणजे तेथेही प्रसाद व अंगारा देण्याची पद्धत आहेच; पण तेथील अंगाऱ्याला अंगारा न म्हणता उदी म्हणतात एवढेच !

पण पुढे प्रश्न निर्माण होतो ही उदी तरी कोठून येते ? श्रीसाईसच्चरितामध्ये उदीचा प्रभाव वर्णन करण्यासाठी हेमाडपंतांनी तेहतीस व चौतीस हे दोन पूर्ण अध्याय खर्ची घातले आहेत. एवढे महत्त्व आहे बाबांच्या उदीचे ! बाबांची प्रसिद्धी वाढू लागली त्याप्रमाणे लोक बाबांना दक्षिणा देऊ लागले. काही भक्तांकडून बाबा दक्षिणा मागून घेऊ लागले. ह्या दक्षिणेचा विनीयोग मुख्यत्वे गरीब व होतकरूंना वाटण्यातच होत असे. तरी त्यातील काही भाग लाकुडफाटा खरेदी करण्यासाठी होत असे. एखाद्या अग्निहोत्री ब्राह्मणाप्रमाणे बाबा अग्नीची उपासना करीत असत. त्यांनी आपल्या योगसामर्थ्याने अग्नि प्रज्वलीत केला होता व तो अग्निहोत्र्याप्रमाणे कायम जळत ठेवला होता. त्याकरिता त्यांना सदोदित लाकडे लागत व ती विकत घेऊन ते आपली धुनी कायम पेटती ठेवीत. ह्या धुनीतील राख म्हणजेच अंगारा किंवा उदी होय.

आपल्या धुनीतील अग्नीबद्दल बाबा किती जागरूक असत याचे एक उदाहरण साईसच्चरितामध्ये दिले आहे. एकदा शिरडीमध्ये महामारी (कॉलरा) सुरू झाली. त्यामुळे पंचायतीने गावामध्ये काहीही आणावयास बंदी केली. एकदा एक लाकूडफाट्याची गाडी गावाच्या वेशीवर आली; पण बंदीहुकुमामुळे गावच्या पाट-

लाने तिला गावात येण्यास बंदी केली. साईबाबांना तर धुनीसाठी लाकडे मिळविणे आवश्यक होते, तेव्हा त्यांनी तो बंदीहुकूम मोडून ती गाडी गावात आणविली व त्यातील लाकडे आपल्या धुनीसाठी वापरली.

शिरडीत प्रथम आल्यावर साईबाबा कित्येक लोकांना औषधे देत त्यांची औषधे तशी लोक विलक्षणच असत. कारण एका माणसाचे डोळे लाल झाले असता त्यावर बिब्ब्याचा उपयोग करून त्यांनी ते बरे केले. तसेच एका अतिसार झालेल्या माणसाला शेंगदाणे खायला देऊन वर पाणी प्यायला दिले आणि आश्चर्य असे की हे दोनही रोगी पूर्ण बरे झाले! पुढे बाबांनी औषधे देणे बंद करून भक्तांना उदी देण्यास सुरवात केली आणि प्रत्येक भक्ताची विचारपूस करून त्यावर उपाय म्हणून ते उदीचा उपयोग करू लागले आणि दुसरे आश्चर्य म्हणजे ह्या उदीनेही सर्वांचे सर्व रोग बरे होऊ लागले! हे असे का घडू लागते? संतांचे सामर्थ्य अचाट असते. त्यांचा त्रिभुवनातील सर्व वस्तूंवर ताबा असतो. त्यांना शब्दसिद्धी असते. ते म्हणतील ती गोष्ट खरी होते. म्हणून बिब्बा व शेंगदाणे ह्या गोष्टी वैद्यकीय दृष्टया ज्या रोगासाठी त्या वापरण्यात आल्या त्यालाही योग्य नव्हेत; तरीदेखील श्रीबाबांनी आपण म्हणावे त्याप्रमाणे त्या वस्तूत फेरफार करून ज्या इच्छेने त्या ते वापरीत त्या कारणाकरिता त्या उपयोगी पडत. ह्याचप्रमाणे आपणाला सामान्य जनांना जी केवळ उदी म्हणून भासत असे ती खरोखर उदी नसेच! बाबा तिला आपल्या मनातून काही तरी योग्य असे औषध कल्पून ती भक्तांस देत असत आणि त्यांच्या सामर्थ्यामुळे त्या औषधीमुळे अपेक्षित असा परिणाम बाबांनी दिलेल्या उदीने तात्काळ साधत असे.

बाबांच्या उदीचा उपयोग कोणी कोणी कशासाठी केला ह्याची उदाहरणे साईसच्चरित्रात पानोपानी भरलेली आहेत. चावलेला विंचू उतरविणे व प्लेगच्या गाठी व ताप नाहीसा करणे अशा अनेक प्रकारांनी उदीचा उपयोग केल्याचे साईसच्चरित्रात दिले आहे. नारूची जखम भरून येणे व पायावर झालेला व्रण बरा होणे इत्यादी चमत्कार बाबांच्या उदीने घडविल्याचे आपण वाचतो. बाबांच्या निवासामुळे पवित्र झालेल्या शिरडीचे महत्त्व आजतागायत कोठल्याहि प्रकारे कमी झालेले नाही. बाबांनी आपल्या हयातीत आपल्या भक्तांना जे आश्वासन दिले होते ते आजपर्यंत पूर्णतया पाळीत आले आहेत. समाधी घेतल्यावरही मी भक्तांचे रक्षण करीन व त्यांच्या कामाकरिता धावून येईन व झटेन हे त्यांचे आश्वासन आज अनेक भक्तांच्या अनुभवास येत आहे. साईलीला मासिकातून प्रसिद्ध होणाऱ्या भक्तांच्या अनुभवातून असे स्पष्ट दिसते की बाबांच्या उदीचा उपयोग भक्तगण अनेक कामासाठी करीत आहेत

आणि त्यासर्व भक्तांचे ईप्सित साध्य होत आहे. श्रीबाबांच्या उपदेशाप्रमाणे श्रद्धा व सबूरी ह्यांच्या आश्रयाने जे जे भक्त बाबांच्या उदीचा उपयोग करतात, त्यांच्या अडचणी निवारण होतात हा अनुभव लक्षात घेऊन बाबांच्या इच्छेनुसार उदीचा उपयोग करून सर्व भक्तांनी आपल्या अडचणींवर मात करावी एवढीच सर्व साई-भक्तांच्या चरणी माझी प्रार्थना.

# श्रीसाईबाबांनी लग्न जमविले !

—नंदकुमार रामचंद्र खेले
'सौभाग्य' १७४६, शुक्रवार पेठ,
जेधे प्रासाद रस्ता, पुणे–४११००२.

* माझी एक आते मेव्हणी (गौरवर्ण, स्मार्ट, देखणी व सुस्वभावी) लग्नाची होती. लग्न जमविण्यासाठी तिचे आई वडील व नातलग परोपरीने प्रयत्न करीत होते. परंतु कुठेही यश येईना ! पाव्हणे यायचे मुलगी पाहून जायचे, पसंती व्हायची तर पत्रिका जमत नसे. काहीवेळा पसंती होवूनही पाव्हण्यांचे उत्तरच येत नव्हते. इतकी चांगली मुलगी चंद्रासारखी, शांत गृहकृत्यदक्ष नावही तिचे कु. चंदा !

मी अनेक मुलामुलींची लग्ने जमविण्यात यशस्वी झालो, परंतु ह्या मुलीचे जमविण्यात मला हार खावी लागली. चांगल्या मुलीचे वय विनाकारण वाढत होते, सर्वांना काळजी वाटत होती. उपवास, व्रते, देवधर्म व प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही योगायोग येईना, शेवटी मी परमपूज्य श्रीसाईबाबांना ता. ८।११।७७ रोजी नवस केला, "तीन महिन्याचे आत कु. चंदाचे लग्न सुयोग्य तरुणाबरोबर जमावे, बाबा माझी हाक ऐका ! जर लग्न जमले तर हा अनुभव श्रीसाईलीला मासीकात प्रसिद्ध करीन !"

श्रीबाबांनी यापूर्वी अनेकवेळा प्रचिती दाखविलेली होती. ह्यावेळीसुद्धा तोच अनुभव प्राप्त झाला व माझ्या आते मेव्हणीचे लग्न अचानक कऱ्हाडच्या एका सुयोग्य तरुणाबरोबर जमले. नवस केल्यापासून तीन महिन्याचे आतच जमले. साखरपुडा झाला ! हा शुभविवाह थाटात, आनंदात ता. १५ मार्च १९७८ ला पार पडला. श्रीबाबांवर श्रद्धा असल्यामुळेच त्यांनी माझे मेव्हणीचे लग्न जमविले.

# माझा साई नामावरील विश्वास

—कु. जयश्री कृ. ससाळकर
विरार, सताळा.

* मंगळवार दि. १८ एप्रिल १९७८ रोजी घडलेली भीषण दुर्घटना. नायगाव वसई या दरम्यात झालेल्या अपघातातून मी श्रीबाबांच्या नामोच्चाराने सुखरुप वाचले. आमची गाडी दादरहून सात वाजता सुटली ती ८ च्या दरम्यात नायगाव स्टेशनवर आली. तिथून सुटताच पुढे सीग्नल नसल्यामुळे थांबली होती ती जरा हालत नाही तोच एकदम प्रचंड वीज कोसळल्याप्रमाणे आम्हाला वाटले आणि पुढे भयंकर काळरुप उभे राहिले. सर्व स्त्रीयांचा एकच कल्लोळ झाला आणि पुढील घटना ही अतिशय भयानक घडली.

मी डब्यातून बाहेर पडण्याकरिता धडपडत असता मला दोन तरुणांनी कसेबसे बाहेर काढले, परंतु मी फारच घाबरुन सुन्न झाले होते. माझा सारखा बाबांच्या नामाचा जप चालू होता. सर्व मन बाबांच्या धावेकडे गुंतले होते. डब्यातून उतरल्यानंतर माझ्यासोबत असलेली माझी मैत्रीण मात्र मला भेटली नाही. ती या दुर्घटनेत जबर जखमी झाली आहे. मी साधारण सावध झाल्यानंतर एस. टी. ने माझ्या घरी सुखरूप पोहोचले.

बाबांच्या असीम कृपेने एवढ्या मोठ्या संकटातून मी काहीही दुखापत न होता वाचले. हा बाबांच्या अपार महिमेचा प्रतापच नव्हे काय? अशीच कृपादृष्टी आम्हास लाभो हीच बाबांच्या चरणी प्रार्थना.

*


## 'श्री क्षेत्र शिरडी मार्गदर्शिका'

: लेखक :

**※ सदानंद चेंदवणकर ※**

मराठी व हिंदी भाषेत प्रसिद्ध

**किंमत फक्त एक रुपया**

मुखपृष्ठावर श्रीबाबांचे मोहक चित्र

मुंबई व शिरडी येथील कचेरीत उपलब्ध

# महान संत कलावती देवी

श्री. एल. जी. परुळेकर,
'केदार' प्लॉट नं. १७३,
अभिनव नगर, बोरीवली.

बुधवार दिनांक ८ फेब्रुवारी १९७८ रोजी सायंकाळी सहा वाजता मुंबईत एक समर्पित दैवी जीवन अनंतात विलीन झाले. आई कलावती देवींच्या अकस्मात् झालेल्या महानिर्वाणाची ती बातमी ऐकून त्यांचे असंख्य भक्त शोकाकूल झाले. गेल्या वर्षी त्यांचा धाकटा मुलगा वयाची पन्नाशी ओलांडण्यापूर्वीच मरण पावला. त्या करुण प्रसंगी सुद्धा व्यक्त झालेली आईची विरक्ती पाहून त्यांचे भक्त आश्चर्याने थक्क झाले होते. मुलाच्या शवावरून प्रेमाने हात फिरवून आणि सुनेचं सांत्वन करून ठरलेल्या वेळी त्यांनी आपल्या प्रवचनाला सुरुवात केली. इकडे लाडक्या मुलाची चिता धगधगत आहे तर दुसरीकडे शांतपणे आईचे निरूपण सुरू आहे. केवढे दिव्य वैराग्य !

सुसंकृत व सात्विक गुणानी युक्त असे कल्याणपुरकरांचे घराणे. या घराण्यात श्रीमत् परमहंस शिवरामस्वामी या नावाचे एक थोर पुरुष होऊन गेले. ते बाल संन्यासी होते. म्हैसूर मधील कारवार जिल्ह्यात बंकीकोडल येथे त्यांचा मठ आहे. बरीच वर्षे जगतोद्धाराचे काम करून अलीकडेच वयाच्या पंचाण्णवाव्या वर्षी त्यांनी समाधी घेतली. त्यांचा चुलत पुतण्या शांताराम उर्फ बाबुराव हे आईवडीलांचे एकुलते एक पुत्र. त्यांचा स्वभाव अतिशय मनमिळाव्र व गोड असा होता. त्यांच्या पत्नीचे नाव सीतामाई. त्यापण सत्यनिष्ठ व परोपकारी पतिव्रता होत्या. इ. स. १९०७ मध्ये श्रावण-मासात सुपुत्र प्राप्तीच्या अपेक्षेने बाबुरावांनी सहस्त्रलिंगार्चनास आरंभ केला. त्याची समाप्ती दुर्गाष्टमीच्या दिवशी झाली. त्याच दिवशी रात्री "मी तुझ्या वंशात जन्म घेणार आहे" असा देवीने बाबुरावाना दृष्टांत दिला. पुढे लवकरच त्यांना याची प्रचिती आली. पोटी येणाऱ्या अंशाने गरोदरपणातच डोहाळ्याच्या रूपाने आपले वैशिष्ठ्य दाखविण्यास सुरवात केली. सीतामाईना गरोदरपणी संतमुखाने बोध श्रवण करावा, त्याचे मनन करावे असे वाटू लागले. घरात त्या नामस्मरण आणि सद्ग्रंथाचे वाचन करू लागल्या. त्यांच्या डोहाळ्यावरून कोणी थोर व्यक्ती त्यांच्या उदरी जन्म घेणार असे सर्वांना वाटू लागले. अशा या देवभक्त जोडप्याच्या पोटी इ. स. १९०८ च्या ऋषी पंचमीस आईचे अवतरण झाले. बाराव्या दिवशी बाबुरावांनी मुलीचा नामकरणोत्सव थाटात साजरा करून तिचे रुक्माबाई असे नाव ठेवले. पण बोलण्यात सर्वचजण तिला 'बाळ' म्हणूनच संबोधित.

बाळ सहा महिन्यांची असतानाच तिच्या खांद्याला मोठ्या सुपारीएवढे एक गळू झाले. पण ते दुःख किंचितही किरकीर न करता तिने सहन केले. बाळ दहा महिन्यांची असतानाच चालू लागली आणि पहिल्या वाढदिवसाच्या दिवशी तिने बोलायला सुरुवात केली. परंतु दादा बाबा असा कोणताही बाल-सुलभ शब्द न उच्चारता 'हरी' हाच शब्द तिने प्रथम उच्चारला. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात ही म्हण पुढे खरी ठरली. बाळच्या वयाच्या तिसऱ्या वर्षी तिचे वडील बाबुराव कारवारहून गोकर्ण येथे राहावयास गेले. तेथे त्यांनी वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. बाबुरावांना संगीताची पण अभिरुची होती. त्यांच्या घरी रोज संध्याकाळी भजनाचा परिपाठ होता. त्यामुळे सहजच लहानपणापासून बाळचे हरिभजनाकडे चित्त वेधले गेले. वयाच्या पाचव्या वर्षापासून बाळ मराठी, कानडी, हिंदी, व गुजराथी भाषेतील भजने म्हणत असे. तेथील मंडळी मोठमोठ्या समारंभात तिच्याकडून कौतुकाने भजन म्हणवून घेत असत. तिची स्थिर बसण्याची पद्धत, आवाजातील मधुरता आणि शांत वृत्तीने भजन म्हणण्याची रीत पाहून श्रोते मंडळी अगदी तल्लीन होऊन जात.

कळू लागल्यापासून केस विंचरणे, आंघोळ करणे, कपडे धुणे इत्यादि स्वतःची कामे बाळ स्वतःच करीत असे. बाळचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ती कपड्याला साबण लावीत असताना तिच्या हातातील वडी पूर्ण झिजेपर्यंत चौकोनी ती चौकोनीच राही. त्यावेळी बाळचे वय अवघे सहा वर्षांचे होते. बेरीज, वजाबाकी, हिशेब करणे हे सर्व तिला शाळेत जाण्यापूर्वीच येऊ लागले होते. बाळला सातवे वर्ष लागले तेव्हा तेथील कानडी शाळेत तिचे नाव घालण्यात आले. दर वर्षी वैष्णवाच्या मठात चातुर्मासात मंगळूरचे समर्थ सांप्रदायी बाळ हरिदास यांचे कीर्तन संपल्यावर बाळ लडिवाळपणे त्यांच्या जवळ जाऊन बसे आणि कीर्तनात ऐकलेल्या गूढ शब्दाचा अर्थ समजून घेण्यासाठी त्यांना प्रश्न करी. कधी कधी घरातील सर्व माणसे झोपी गेल्यावर बाळ हळूच उठून हातात चिपळया घेऊन कीर्तन करू लागे. त्यावेळी रात्रीचे बारा वाजले तरी तिला झोपेचे भान रहात नसे. वर्षातून तीन महिने कोटीतीर्थावर कार्तिक, माघ आणि वैशाख स्नान करण्याचा बाळचा नियम वयाच्या सातव्या वर्षापासून लग्न होईपर्यंत अखंड चालू होता. बाळ राहिलेल्या वाड्यात एकदा स्वामी पूर्णानंद सरस्वती नावाच्या परमहंस संन्याशाचे आगमन झाले. त्यावेळी बाळचे वय सात वर्षांचे होते. स्वामींचा त्रिकाळ पूजेचा नियम होता. पूजेच्या वेळी बाबुराव पेटी वाजवीत व बाळ भजन म्हणत असे. बाळची तालबद्धता, गोड गळ्याने व तल्लीन वृत्तीने भजन म्हणण्याची रीत, संत-संगतीची आवड तसेच परमेश्वराच्या ठिकाणी असलेली तिची भक्ती आणि तिचा प्रेमळ स्वभाव हे सर्व पाहून स्वामींची तिच्यावर संपूर्ण कृपा झाली. त्यांनी आपल्याकडील श्रीकृष्णाची

मूर्ति काढून ती बाळला पूजेसाठी दिली आणि बाबुरावांकडे वळून ते म्हणाले, "ही तुमची मुलगी सामान्य नसून खास लोकोद्धारार्थच अवतरली आहे. ही वयाच्या अठरा वर्षांपर्यंतच तुमच्यामध्ये राहील. त्यानंतर विरक्त होऊन सर्वांपासून दूर जाईल." तेव्हापासून श्रीपूर्णानंदांकडून मिळालेला तो गोपाळकृष्ण हेच बाळचे सर्वस्व होऊन बसले.

पुढे शाळेत बाळची तिसरीची परीक्षा सुरू झाली. परीक्षेच्या शेवटच्या दिवशी बाळ घरी येण्याकरता शाळेच्या पायऱ्या उतरू लागली. इतक्यात तिच्यापुढे एक लहानसा कागद वाऱ्याने उडून लांबवर गेला. तिने तो पकडण्याचा प्रयत्न करूनही हाती येईना. पण एकाएकी वाऱ्याची झुळूक आली आणि त्यासरशी तो कागद तिच्या छातीवर येऊन बसला. त्यावर तो कागद बाळने वाचला. त्याच्यावर, 'जब तुम आया जगतमें तब जन हासे तुम रोय। अब ऐसी करणी कीजिये कि तुम हासे जन रोय ॥' हा दोहा होता. लगेच बाळने वडिलांकडून त्याचा अर्थ विचारून घेतला. आश्चर्य म्हणजे तेव्हापासून तिच्या कृतीत पूर्वीपेक्षा अधीक गंभीरपणा जाणवू लागला. हळू हळू तिने शाळेत जाण्याचेही बंद केले. सारा वेळ श्रीकृष्णाची भक्ती करण्यात जाऊ लागला. बाळ देवाला आळवीत असता, "हे प्रभो ! मी लहान आहे ना ? तेव्हा माझ्याकडून तुझ्या सेवेत काही चुकत असेल तर तू रागावू नकोस हं!" अशी विनवणी करीत असे. कृष्णाचे नाव काढले की तिच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागत. या वयापासूनच बाळला वृक्ष, कृमी, कीटक, पशु, पक्षी कोणतेही प्राणी असोत, त्यांना दुखविणे हे मोठे पाप आहे असे वाटत असे. तसेच तिला सद्ग्रंथ केवळ वाचण्यात ठेवण्यापेक्षा त्यातील बोधाप्रमाणे वागणे अधिक आवडत असे.

बाळचे शिशुपण संपून हळू हळू ती यौवनाच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवित होती. तिच्या आतापर्यंतच्या चरित्रावरून तिला झालेला लाभ म्हणजे गोकर्णासारख्या पवित्र क्षेत्राचा वास, घरातील नियमित भजन, वरचेवर संतांचा सहवास, सद्बोध श्रवण, श्रीपूर्णानंदस्वामींचा आशीर्वाद याबद्दल जर थोडा विचार केला तर खास जगतोद्धाराचे कार्य करवून घेण्यासाठीच परमेश्वराने ही सर्व पूर्व तयारी तिच्याकडून करवून घेतली असावी असे वाटते. एकंदरीत अशा प्रकारे बाळच्या वयाची चौदा वर्षे हां हां म्हणता निघून गेली. पंधरावे वर्ष लागले आणि ईश्वरी संकेतानुसार तिच्या विवाहाचा योग अचानक जुळून आला. तिचा सहवास ज्याना मिळाला त्या सर्वांना चौदा वर्षांचा काळ म्हणजे एका क्षणासारखा भासला असेल. ज्यानी तिच्या बाल-पणातील आनंद लुटला त्या सर्वांनाच ती सासरी गेल्यावर आपल्याला जणू आनंदाचे स्वप्नच पडले होते की काय असे वाटले असेल. बाळ म्हणजे जणू आनंदाचा समुद्रच. तिच्या लीला म्हणजे त्या आनंदसागरातील लहरी. अशा या

आनंद लहरीतील तुषार ज्यांच्या अंगावर उडाले असतील ते खरोखरच धन्य होत.

दक्षिण अर्काटातील कडलूर जिल्ह्यात राहाणारे पोलीस इन्स्पेक्टर श्री. राजगोपाल मल्लापूरकर यांचेबरोबर बाळचा विवाह झाला. सासरच्या लोकांनी तिचे पाळण्यातील रुक्माबाई हेच नाव विवाहोत्तर कायम ठेवले. रुक्माबाईचे सासरचे वागणे सर्व स्त्रियांना आदर्शभूत असेच होते. रुक्माबाईच्या दृढ निष्ठेमुळे सासरच्या माणसांकडून त्यांना परमार्थ मार्गात सहाय्यच झाले. राजगोपालांचा स्वभाव पण रुक्माईच्या स्वभावाला पूरक असाच होता. वयाच्या सतराव्या वर्षी त्यांना एक मुलगा झाला. त्याचे नाव मोठ्या प्रेमाने त्यांनी बालकृष्ण असे ठेविले. पण यानंतर रुक्माबाईच्या नशिबात फार सुख भोगावयाचे नव्हते. इ. स. १९२७च्या आषाढी एकादशीच्या दिवशी त्यांच्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षी, दुसरा मुलगा आठ महिन्याचा पोटात असताना त्यांच्या पतिदेवांचे एकाएकी हृदयक्रिया बंद पडून देहावसान झाले. उण्यापुऱ्या चार वर्षातच त्यांच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. या महान आपत्तीचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला. पतीचे धर्मराज्य संपले. तेव्हा आता आपण जगून काहीच उपयोग नाही म्हणून हताश हृदयाने घराजवळच्या मैदानातील एका विहिरीत त्या आत्महत्या करावला प्रवृत्त झाल्या. त्या विहिरीत

## साई भक्तांस प्रकट विनंति

श्रीसाईसच्चरित्रातील उल्लेखांवरून असे दिसते की श्रीसाईबाबांना येणाऱ्या असंख्य पत्रांतील काहींची उत्तरे ते श्यामा, जोग इत्यादींच्या मार्फत पाठवीत असत. सौ. सुधा जानी ह्या अहमदाबाद येथील एका साईभक्त महिलेने पत्राद्वारे अशी सूचना केली आहे की ही सर्व पत्रे एकत्र करावी व छापावी. पत्र लेखिकेची सूचना केव्हाही स्वागतार्हच आहे; परंतु ती प्रत्यक्षात आणणे कितपत शक्य होईल ह्याबद्दल शंकाच आहे. दि. ११-१०-७८ ला येणाऱ्या दसऱ्याला श्रीबाबांनी महासमाधी घेतल्यास साठ वर्षे पूर्ण होतात. तेव्हा त्यांनी लिहिलेली पत्रे ही १९१८ च्या पूर्वीची असणार. आपल्यांपैकी बहुतेक लोकात ऐतिहासिक दृष्टी फारच कमी असते. त्यामुळे श्रीबाबांची ही पत्रे कोणी जपून ठेवली असण्याची शक्यता फारच कमी आहे; तरी देखील सर्व साईभक्तांस याद्वारे अशी विनंति करण्यात येत आहे की, जर कोणापाशी अशी पत्रे असतील तर ती त्यांनी आमचेकडे पाठवावी. काम झाल्यावर ती ज्याची त्यास परत करण्यात येतील.

— संपादक

उडी मारणार तोच एक जटाधारी साधू प्रगट झाला आणि म्हणाला, "माई थांब, आत्महत्या करण्यासाठी तू जन्माला आली नाहीस. जीव देणाऱ्याना वाचविण्यासाठी तुझा जन्म आहे. तुझ्या हातून जगदोद्धाराचे थोर कार्य व्हावयाचे आहे. लवकर हुबळीला जा, सिद्धारूढ स्वामींच्या कृपेने तू सुखरूप होशील." इतके बोलून तो अदृश्य झाला. त्यावेळी सद्गुरु सिद्धारूढ महाराजच आपले सांत्वन करण्यास या रुपाने आले असावेत असे वाटून रुक्माबाईंना गहिवरून आले. आणि त्या क्षणापासूनच दुःखाने व्याकूळ झालेले त्यांचे मन एकदम शांत झाले. पतिनिधनानंतर थोड्याच दिवसात रुक्माबाईंचे वडील बाबुरावही स्वर्गवासी झाले. त्यानंतर त्या फारच विरक्त झाल्या. संसारात त्यांना बिलकूल रस वाटेना. वडिलांच्या मृत्युनंतर एका महिन्याने मुलाचा मायापाश तोडून राजपुत्र सिद्धार्थाप्रमाणे कोणालाही नकळत एका वस्त्रानिशी त्या हुबळीला सिद्धारूढ स्वामींच्या मठाला गेल्या. स्वामींचे जेव्हा प्रथम दर्शन घडले, तेव्हा ते रुक्माबाईंना उद्देशून म्हणाले, "आलीस! तुझीच मी वाट पहात होतो." पुढे स्वामींच्या आज्ञेनुसार त्या मठात राहून सेवा करू लागल्या. रुक्माबाईंची त्यावेळची तपश्चर्या खरोखरच असामान्य होती. त्यांचे नेसावयाचे एकच लुगडे होते. आंघोळीच्या आधी त्याचा अर्धा भाग त्या धुवून वाळवीत आणि आंघोळ केल्यावर तो भाग नेसून, दुसरा अर्धा भाग धुवून वाळवून तो त्या नेसत असत. आहाराकडे तर त्यांचे मुळीच लक्ष नसे. यदृच्छेने जर कोणी केळी, पोहे वगैरे काही आणून दिल्यास तेवढेच त्या खात, नाहीतर नुसत्या तळ्याच्या पाण्यावर त्या आठ आठ दिवस रहात. एका गोणपाटावर उशाला वीट घेऊन त्या झोपत असत आणि मठातील बांधकामासाठी दगड, विटा वाहण्याची श्रमसेवा त्या करीत. 'ॐ नमः शिवाय' हा मंत्र नेहमी जिभेवर सारखा घोळत असावयाचा. तसेच उपास घडले तरी रोजच्या सेवेत किंचितही कसूर होत नसे. त्यांच्या निरभिमानीपणाने व अत्यंत आपुलकीने केलेल्या सेवेला संतुष्ट होऊन स्वामी सिद्धारूढांनी रुक्माबाईवर कृपा केली.

रुक्माबाईंच्या अंगावर जरी उंची वस्त्रे किंवा दागदागिने नव्हते, तरी त्यांचा तो काळा भोर लांबलचक केशसंभार, सतेज, कोमल व गौरवर्ण अशी काया नेहमी प्रसन्न असणारी मुद्रा, आनंद भरून ओसंडणारे पाणीदार डोळे, पांढरा शुभ्र पोषाख, कपाळाला भस्म, हातात स्मरणी, चेहऱ्यावरचे अप्रतीम तेज, तीव्र वैराग्य वृत्ती आणि अवघे एकोणीस वर्षांचे वय हे सर्व पाहिल्यावर कोणाच्याही मनात त्यांच्याविषयी पूज्य भाव उत्पन्न झाल्याशिवाय रहात नसे. स्वामी सिद्धारूढांनी रुक्माबाईंवर कृपा केली तो दिवस इ. स. १९२८ चा दसऱ्याचा दिवस होता. त्या दिवशी महाराजांनी आपली शाल रुक्माबाईंना देऊन त्यांचे 'कलावतीदेवी' असे नामाभिधान केले. त्यानंतर त्यांनी कलावतीदेवींना पहिल्यांदाच निरूपण करण्यास सांगितले.

शालीच्या रूपाने महाराजानी कलावती देवीवर जणू कृपेचे पांघरूण घातले. त्यामुळे त्यांच्या प्रासादिक वाणीतून निघालेले " नामसंकीर्तन साधन वै सोपे " या अभंगावरील गोड निरूपण ऐकून सारी श्रोते मंडळी मुग्ध होऊन गेली. त्यानंतर ज्या ज्या दिवशी महाराजांची आज्ञा होई त्या त्या दिवशी कलावतीदेवींचे मठात कीर्तन होत असे. गुरुसेवा करता करता, दिवसे दिवस देवींचे तहान, भूक, झोप इत्यादी देहधर्म सुटत गेले. एके दिवशी त्या ध्यानमग्न असता सिद्धारूढ महाराजांनी देवींच्या मस्तकावर आपला कृपाहस्त ठेवला आणि महाराजांच्या कृपेने देवीच्या ठिकाणी ज्ञानज्योत प्रज्वलीत झाली. दयामय सद्गुरूंनी सुख दुःखरहित अशा निजरूपाचे दर्शन देऊन देवीना कृतार्थ केले. पुढे इ. स. १९२९ साली श्रावणातील एका सोमवारी स्वामींनी देवींना जवळ बोलावून घेतले आणि " मी लवकरच समाधी घेणार आहे. त्यानंतर तू सहा महिने साधनाभ्यास कर. त्यावर बारा वर्षेपर्यंत कीर्तनाच्या निमित्ताने गावोगावी जाऊन हरीनामाचा व विश्वप्रेमाचा प्रसार कर. मी सदासर्वकाळ तुझ्या जवळ आहेच. तू अगदी निर्भय रहा. " असे सांगून साधनाभ्यासाबद्दल त्यांना काही विशेष सूचना दिल्या. महाराज देवीना पुढे म्हणाले, " बारा वर्षानंतर बेळगावला जाऊन अनगोळला स्थायीक हो. तेथे फार मागासलेले लोक आहेत. त्यांना बोध करून त्यांच्या ठिकाणी हरिप्रेम उत्पन्न होईल असे कर " सात दिवसांनी म्हणजे श्रावण कृष्ण प्रतिपदेला पहाटे चार वाजता महाराजांनी आपले अवतार कार्य संपविले.

गुरुंच्या आज्ञेप्रमाणे कलावतीदेवींनी सहा महिन्याच्या साधनेनंतर ठिकठिकाणी कीर्तनासाठी भ्रमंती सुरू केली. देवींच्या कीर्तनातील वैशिष्ट्य म्हणजे निरूपणात अवडंबर नसावयाचे. संतांचा एखादा अभंग घेऊन त्याचा बाह्यार्थ, गर्भितार्थ व त्यातील तत्व स्पष्ट करावयाचे आणि ते पटविण्यासाठी जरूर ते दृष्टांत त्या द्यावयाच्या. कीर्तनाला सुरवात झाली की देवी त्यामध्ये एकरूप होऊन जात, श्रोते भारावून जात. त्यांच्या कीर्तनाला कधीच कोणी कंटाळत नसे. कर्नाटक आणि महाराष्ट्रामध्ये असंख्य


## – श्रीसाईलीला –

**खास गुरुपौर्णिमा अंक**

**१ जुलै १९७८ रोजी थाटात प्रसिद्ध होणार**

ठिकाणी देवींनी भेटी देऊन गुर्वाज्ञेप्रमाणे कीर्तन सेवा बजावीत असताना समाजात मानसिक आणि वैचारीक जागृती निर्माण केली. हजारो लोक त्यांचे भक्त बनले. तरीही त्यांना त्रासही बराच सहन करावा लागला. कित्येक वेळा त्यांच्या जिवावर पण बेतले होते. रामदास, तुकारामासारख्या संतश्रेष्ठांना किंवा प्रत्यक्ष साईबाबानाही त्यांच्या हयातीत समाजातील दुष्ट प्रवृत्तीपासून किती त्रास सहन करावा लागला होता त्याची कल्पना केल्यास देवींना सहन कराव्या लागलेल्या त्रासाची कल्पना होऊ शकेल. पीडित लोकाना देवी औषधपाणी करून बरे करीत आणि भक्तिमार्गाला लावीत. देवी मात्र आपल्या भक्तांना हेच सांगत की "बाबानो आजवर ज्या काही आश्चर्य-कारक गोष्टी घडून आल्या असतील तो सर्व देवाच्या प्रार्थनेचाच प्रताप होय. यासाठी तुम्ही सर्वांनी नामस्मरणाची सवय ठेवा." रूग्णाना औषध म्हणून काहीतरी देताना देवी त्यांच्याकडून 'ॐ नमःशिवाय' या मंत्राचा जप करून घेत. या काळात कित्येक लोकानी देवींच्या दिव्य वैराग्याने दिपून जाऊन आपली लाखो रुपयांची मालमत्ता देवींच्या चरणी अर्पण करण्याची तयारी दाखविली. एवढेच नव्हे तर त्याचा सारखा आग्रह धरला असताही, त्यानी अशा देणग्या स्वीकारण्यास नम्रतापूर्वक नकार दिला.

अशा प्रकारे बारा वर्षांची कीर्तनसेवा पूर्ण झाली आणि त्यानंतर पहिल्याच आठवड्यात सांताक्रुझचे श्री. एम्. शिवराव याना बेळगाव येथे अनगोळ माळावर एखादी जागा घेऊन ती कलावतीदेवींना अर्पण करण्याबद्दल श्री. सिद्धारूढ स्वामींचा दृष्टांत झाला. देवींचा पत्ता काढीत काढीत ते बेळगांवला टळकवाडीस आले आणि दृष्टांताची वार्ता त्यानी देवींच्या पुढे निवेदन केली. तेव्हा "तुमच्याप्रमाणे मलाही दृष्टांत झाल्याशिवाय मी तुमचे म्हणणे मान्य करू शकत नाही." असे देवींनी त्यांना सांगितले. त्यावर त्याच रात्री स्वामींनी देवींना पण दृष्टांत दिला. नंतर शिवरावनी अनगोळच्या माळावर एक प्लॉट विकत घेऊन तो देवींना अर्पण केला. तत्पूर्वी किंवा त्यानंतरही देवींनी कोणाकडूनही कसल्याही देणगीचा स्वीकार केला नव्हता. त्यांनी जो काही स्वीकार केला तो फक्त या देणगीचाच आणि तोही महाराजांच्या आज्ञेवरून. ह्याच शिवरावनी काही वर्षांपूर्वी त्यांची सौभाग्यवती अकरा वर्षांच्या मेंदूच्या आजारा-तून देवींच्या कृपेने पूर्ण बरी झाल्याची कृतज्ञता व्यक्त करताना देवींना दोन हजार रुपयांची देणगी देऊ केली असता देवींनी ती नेहमीप्रमाणे नाकारली होती. त्याची रुखरुख शिवरावांच्या मनाला सारखी लागून राहिली होती ती आता शमली आणि ते कृतकृत्य झाले.

जागा मिळाली. पुढे त्या जागेवर आश्रम कसा बांधावयाचा हा प्रश्न निर्माण झाला. पण देवींना यापुढे अनगोळलाच स्थायिक करण्याची सद्गुरु महाराजांचीच इच्छा असल्याकारणाने बांधकामाची तयारी मोठ्या आश्चर्यकारक रीतीने होत गेली.

देवी सिद्धारूढ स्वामींच्या मठात जाण्यापूर्वी उमाबाई मणिगार यानी त्यांचे सर्व दागिने मुलीच्या लग्नानिमित्त वापरण्यास नेले होते. पण काम झाल्यावर ते परत करण्याची तसदी त्यानी घेतली नाही. एवढ्या वर्षानंतर त्या बाई देवीचा शोध करीत करीत बेळगावला आल्या आणि बारा वर्षांच्या व्याजासहीत बावीस तोळे सोन्यांच्या दागिन्यांचे सर्व पैसे देवीच्या स्वाधीन केले. त्याचप्रमाणे दिंडिवनमला श्री. राजगोपालांच्या एका स्नेह्याकडे पाच हजार रुपये येणे होते. राजगोपाल निधन पावल्यानंतर ते पैसे परत करण्याचा त्या स्नेह्यांना विसर पडला होता. ते गृहस्थ पण याच वेळी देवींचा पत्ता काढीत बेळगावला आले आणि त्यांनीही चौदा वर्षांच्या व्याजासकट पाच हजार रुपये देवींच्या स्वाधीन केले. दरम्यान देवींचे दोन्ही मुलगे पण देवीकडे येऊन राहिले. प्रत्यक्ष बांधकामाच्या वेळी कित्येक लोकांनी स्वयंस्फूर्तीने श्रमदान करून इमारत लवकर उभी केली.

अनगोळच्या ओसाड माळावर उभी राहिलेली इमारत तीच आजचे श्रीहरी मंदीर किंवा परमार्थनिकेतन होय. मंदिरात कोणत्याही देवदेवतांची मूर्ती नसून ते फक्त प्रार्थनागृह आहे. श्रीहरी मंदिरात देवींचा आध्यात्मिक कार्यक्रम घड्याळाच्या काट्याप्रमाणे चालत असे. देवींच्याकडे येणाऱ्या लोकांमध्ये अनेक जाती धर्मांचे आणि समाजातील सर्व थरांवरचे लोक असत. त्यात आसपासच्या बोहारी जमातीतील लोकांचा विशेष भरणा असे.

पूर्वी हे बोहारी लोक उदरनिर्वाहार्थ भिक्षा मागत असत. त्यानंतर ते जुन्या कपड्यांवर भांडी, बरण्या इ० विकण्याचा धंदा करू लागले. सध्या त्यांची मुले शिक्षण घेऊन नोकरी धंदा करीत आहेत. तरी त्यांना लहानपणापासून देवींच्या कडून बोधामृत मिळत गेल्यामुळे त्यांच्या वागण्यात एक प्रकारची नम्रताच दिसून येते. अशा प्रकारे देवींनी युक्ति-प्रयुक्तिने या लोकांची मने देवाकडे वळवून त्यांच्यात कमालीची वैचारिक व मानसिक जागृती घडवून आणली.

कोणत्याही महत्वाच्या कामासाठी बोहारी लोक देवींचा सल्ला घेतल्याशिवाय पुढे पाऊल टाकीत नाहीत. या लोकांचे डॉक्टर, वकील, गुरु, मायबाप सर्व काही देवीच होत. या लोकानीच प्रथम कलावती देवीना 'आई' या नावाने संबोधण्यास सुरवात केली. आणि तेच नाव नंतर सर्वमुखी कायम झाले. आठ फेब्रुवारीला आईंचं महानिर्वाण झालं आणि इतर सर्व भक्तांपेक्षा हे बोहारी लोक जास्त पोरके झाले. त्यांच्या डोक्यावरचे छत्र गेले. जणू आभाळच कोसळले त्यांच्यावर. मागास जमातीच्या सुधारणेसाठी भारतीय घटनेने दिलेले अधिकार आणि सवलती राबवून सुद्धा भारतातील मागासलेला समाज खेड्यापाड्यातून अजूनही त्याच स्थितीत खितपत

पडलेला दिसून येतो. आध्यात्मिक जागृती तर दूरच राहिली. पण संत कुठल्याही मदतीविना केवढे महान कार्य करतात त्यांचे एक बोलके उदाहरण म्हणजे अनगोळच्या पठारावरील बोहारी समाजाचा आईने केलेला आध्यात्मिक आणि त्याचबरोबर भौतिकही असा संपूर्ण कायापालट होय. आईचे सगुण रूप यापुढे आपल्या चर्म-चक्षूंना दिसणार नाही. पण त्यांचे कार्य मात्र समाजपुरुष यावत् चंद्रदिवाकरौ सुरू ठेवील यात तिळमात्र शंका नाही. आईचा पार्थिव देह नऊ फेब्रुआरीला अनगोळला आणला गेला त्यावेळी बोहारी भक्तांनी व्यक्त केलेले दुःख वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतील. थोड्याच दिवसात त्या समाधी घेणार असल्याचे अगोदरच नक्की झाले असल्यामुळे त्यांच्या समाधीचे बांधकाम गेल्याच वर्षी पूर्ण झाले होते. देह समाधीत ठेवण्यापूर्वी आपल्या बोहारी भक्तांचा वेडा आग्रह पण देवींनी पुरा केला. महानिर्वाणाच्या वेळेपासून २७ तासानंतर त्यांना भक्तांच्या आग्रहास्तव सिद्धासन घालून बसविण्यात आले आणि त्याच क्षणी आईच्या चेहऱ्यावरील मृत्यूची निशाणी पूर्णपणे नाहीशी होऊन त्या पूर्ववत सतेज दिसू लागल्या. आईंनी आपल्या भक्तांचा इष्ट पुरविला. त्यांचा देह आता त्याच स्थितीत समाधी मंदिरात चिरविश्रांती घेत पडला आहे.

**आईंनी लिहिलेल्या पुस्तकांची नावे खालीलप्रमाणे :—**

परमार्थमार्गदर्शन, श्रीकृष्णप्रताप, कथासुमनहार, सिद्धरुढवैभव त्याशिवाय नित्योपासना व बालोपासना ही दोन छोटीशी पुस्तके आहेत. परमार्थमार्गदर्शन या पुस्तकाचे पाच भाग म्हणजे पाच स्वतंत्र पुस्तके आहेत. आईंनी लोकांना केवळ उपदेशच केला नसून तो स्वतः प्रथम प्रत्यक्षात आचरणात आणला. तसेच परमेश्वर-रूप सद्गुरूवर अढळ श्रद्धा ठेवणाऱ्यांचे तो पावलोपावली कसे रक्षण करतो याचे ‘ आई ’ हे एक चालते बोलते उदाहरण आहे. आई चमत्कार करण्यापासून नेहमी दूर रहात होत्या तरीही अनाहूतपणे त्यांच्याकडून केल्या गेलेल्या आणि भक्तांनी अनुभवलेल्या चमत्कारांचे वर्णन करण्यास एक स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल.

इ. स. १९५७ साली बेळगावात चहुकडे फ्लूची साथ सुरू झाली. बोहारी लोक अर्थातच संकटाचे निवारण करण्यासाठी आईकडे धावले. आईंनी प्रत्येकाला एकेक बाटली आणण्यास सांगून त्यांना त्यातून श्रीहरी मंदिराच्या विहिरीतील पाणी औषध म्हणून दिले. औषधाला पथ्यही नेहमीप्रमाणेच ‘ ॐ नमः शिवाय ’ या मंत्राचा जप. आश्चर्याची गोष्ट ही की ते औषध कोणाला एकदा घेतल्यावर तर कोणाला दोनदा घेतल्यावर बरे वाटल्याचा अनुभव आला. ही गोष्ट जिकडे तिकडे पसरली आणि परगावचे लोकही या विहिरीचे पाणी तीर्थ म्हणून बाटल्या भरून नेऊ लागले.

साईबाबांच्या उदीप्रमाणेच या पाण्याचा अनुभव असंख्य लोकांना आजही येत आहे. साईबाबा आणि आई कलावतीदेवी यांच्यामध्ये बऱ्याच बाबतीत साधर्म्य दिसून येते. साईबाबांप्रमाणेच देवी सुद्धा पीडिताना औषधपाणी करून त्यांचे रोगनिवारण करीत. साईबाबांच्या 'अल्ला मालिक' या उक्तीप्रमाणेच देवी पण परमेश्वराला कुठल्याही ठराविक नावाने संबोधण्याचा आग्रह धरीत नसत. बाबांप्रमाणे त्याही प्रत्येकाला आपल्या कुलदैवताची भक्ति करण्यास सांगत. श्रीहरी मंदिरात कुठल्याही देवाची मूर्ती नाही. मात्र शिर्डीप्रमाणे तेथेही वर्षातून चार उत्सव होतात. देवींनी स्वतः श्रमसेवा करून भक्तानाही श्रमसेवेचे महत्त्व पटवून दिले. देवी आपल्या भक्ताना स्वतः स्वयंपाक करून वाढीत. हे सर्व आपणाला साईबाबांमधेही दिसून येते.


## – श्रीसाईलीला –

**सर्वांगसुंदर भव्य दिवाळी अंक १९७८**

श्रीसाईभक्तांना आलेल्या बाबांच्या विषयींच्या विविध अनुभवांनी भरगच्च असा छानदार अंक ऐन दिवाळीत थाटात प्रसिद्ध होणार.

श्रीसाईभक्तांनी आपापले नवे, ताजे अनुभव कागदाच्या एकाच बाजूवर थोडक्यात सुवाच्च लिहून ते २० सप्टेंबर १९७८ पर्यंत संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन, ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ या पत्त्यावर पाठवावेत. वरील तारखेनंतर आलेल्या कोणत्याही मजकूराचा स्वीकार करता येणार नाही.

**मुखपृष्ठावर बाबांचे मोहक चित्र** **किंमत सव्वा रुपया**

# "साईची अलौकिक कृपादृष्टी"

पां. वा. भुतकर
२३।१६७५ अभ्युदय नगर,
काळाचौकी, मुंबई नं. ३३.

त्याच असं झालं की नशाबंदी मंडळाची सहल आयोजित झाली. त्यासाठी नशाबंदी मंडळास ३५० रु. मंजूर झाले. आमच्या कॉलनीतील १५-२० महिलांनी नावे नोंदविली. माझी सौ. देखील या सहलीला जावयास उत्सुक होती. सहल गाणगापूर, तुळजापूर, पंढरपूर या तीर्थक्षेत्री आयोजित करण्यात आली होती. एक तर या सहलीतील सर्व महिला माझ्या सौ. च्या मैत्रीणी होत्या. त्यामुळे या सहलीस जाण्याविषयी ती फारच उत्कंठीत होती. तिची एकंदर उत्सुकता पाहून तिला सहलीस जाण्याची अनुमती दिली.

याच दरम्यान तिच्या माहेरचे पत्र आले की तिच्या वडिलांची तब्येत बरी नाही व त्यांत पुढे तिच्या भावाने तिला दिवाळीत गावी बोलाविले होते. या पत्राला अनुसरुन तिने वडिलांची प्रकृती कशी काय आहे अशी विचारणा करणारी दोन पत्रे गावी लिहिली होती, पण गावाहून त्या पत्रांना उत्तर आले नव्हते. ही एकच काळजी करण्यासारखी बाब सोडल्यास बाकी सर्व काही व्यवस्थीत होते.

सहलीचा दिवस जवळ येत होता पण आणखी एक अडचण होती. हिची मासिक पाळी याच दरम्यान येत होती. ती टाळण्याचा उपाय म्हणजे गोळ्या घेणे. पण ही देखील सोपी गोष्ट नव्हती. कारण यापूर्वी ज्या ज्या वेळी तिने गोळ्या घेतल्या होत्या त्या त्या वेळी तिला फार त्रास झाला होता म्हणून डॉक्टरांनी तिला गोळ्या घेण्यास मनाई केली होती. अशा या विचित्र परिस्थीतीत तिच्या मनाची द्विधा परिस्थीती झाली होती.

पूर्वी एकदा गणपतीच्या वेळी देखील अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी तिने साईबाबांची प्रार्थना करून सर्व व्यवस्थित पार पडू दे अशी प्रार्थना केली व तिची प्रार्थना साईबाबांनी ऐकली. त्यावेळी अनंतचतुर्दशी झाल्यानंतर चार पाच दिवसानी हिची पाळी आली. गौरी गणपती तर व्यवस्थित रितीने पार पडलेच पण त्यानंतर आलेले श्राद्ध देखील व्यवस्थित पार पडले.

सहलीला जाण्याची गोष्ट ती वारंवार माझा मुलगा चि. किरण याला सांगू लागली. तो बारा वर्षांचा मुलगा! तो तरी आईला काय सांगणार? शेवटी तो म्हणाला, "मी दोन चिठ्या साईबाबांच्या समोर टाकतो व त्यात येणाऱ्या आज्ञेप्रमाणे तू ठरव." नंतर त्याने 'जावे' व 'जाऊ नये' अशा दोन चिठ्या टेबलावर असलेल्या साईबाबांच्या फोटोफ्रेमसमोर टाकल्या. सौ. ने मोठ्या उत्साहाने चिठी उचलली व चिठी उचलल्यानंतर तिचा चेहरा खरकन् उतरला. चिठीत 'जाऊ नये' हा आदेश होता. हिरमुसल्या चेहऱ्याने तिने पुन्हा प्रयत्न म्हणून परत एकदा चिठी उचलली व याहि वेळेस पुन्हा 'जाऊ नये' हाच आदेश! कुठलीही गोष्ट तीनदा झाल्यास त्रिवार सत्य या म्हणीचा विचार तिच्या मनात डोकावला व त्या विचाराच्या तंद्रीतच तिने आणखी एकदा चिठी उचलली पण याही वेळेस 'जाऊ नये' हाच आदेश! मग मात्र तिचा चेहरा साफच पडला.

तिच्या पडलेल्या चेहऱ्याकडे माझ्या मुलाचे लक्ष जाताच त्याला फार वाईट वाटले व तो म्हणाला, "आई माझ्या हातात हे नाणे आहे. ते मी उडवितो. छाप आल्यास तू जा व काटा आल्यास जाऊ नको." त्याने नाणे फेकले, याही वेळेस काटा आला. नंतर तिने जाण्याचा विचार मोठ्या कष्टाने आवरला.

त्याच रात्री तिला एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात तिचे वडील आमच्या घरी आल्याचे तिला दिसले. दुसरे दिवशी सकाळी सौ. ने मला सांगितले की, "दादा आपले घरी आले असे काल रात्री मला स्वप्न पडले पण ते तर आजारी आहेत ते कसे काय येणार?

आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याच दिवशी रात्री ११ वाजता माझे सासरे छोट्या मेव्हण्यासह घरी आले. त्यांच्या बँकेची जनरल बॉडीची सभा दुसरे दिवशी होती. त्याच्या दोन तीन दिवस आधी त्यांची तब्येत सुधारल्यामुळे वरील सभेकरिता गावाहून मुंबईला येण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

ते आलेले पहाताच तिचा दोन तीन दिवस दुःखी कष्टी झालेला चेहरा आनंदाने उफाळला. साईंनी दिलेला आदेश पाळला व त्याचा शेवट नाट्यमय रितीने गोड झाला या विचाराने ती अक्षरशः आनंद सागरात बुडून गेली. केवढी भक्तांची काळजी! केवढी कृपादृष्टी! साईभक्तांना पदोपदी येणारे लाखो अनुभव लिहावयाचे झाल्यास हजारो हात अपुरे पडतील! या विश्वरूपी साईंना कोटी कोटी प्रणाम!

❀

# वाऱ्यावरचे विचार

—श्री. द. शं. टिपणीस
वजिफदार लॉज, गोखले रोड, ठाणे.

## ३९—ससा

ससा हा प्राणी सर्वांच्या परिचयाचा आहे. सशातला स वाचणाऱ्या चिमण्या पाखरापासून शतायु असलेल्या वटवृक्षापर्यंत सर्वांच्या हा ओळखीचा आहे. गोजिरा गोरागोमटा लोभस प्राणी. पुष्कळ लोक मोठ्या ममतेने त्याला पाळतात. पण कित्येक लेकाचे असे की त्याला खातातही. पाळण्यात व त्यावर ममता करण्यात जो आनंद जे सुख मिळतं ते खाण्यानं मिळत नाही. हे शहाण्या माणसाला मात्र काही समजत नाही ससा हा एक भित्रा प्राणी आहे. सशासारखा दुसरा भित्रा प्राणी कोणी नसेल ( कदाचित मानव याला अपवाद ठरेल. ) माणसाने सशाच्या भित्रेपणाला त्याला साजेल अशा गोष्टीरूपाने चिरंजीव करून ठेवला आहे. ही जुन्या साहित्यांतील ठेव अलिकडील नवसाहित्य वाचनाऱ्याना कळावी म्हणून थोडक्यात देत आहे. एकदा एका जंगलात मोठी धमाल उडाली. त्यांच असं झालं. एका सुप्रभाती एक ससा स्नान करून (धांदरटपणे तो एका डबक्यात पडला होता.) एका झाडाखाली डोळे मिटून बसला गारवाऱ्यामुळे लवकरच त्याची ब्रह्मानंदी टाळी लागली. तो एका डहाळीची दोन चार पानं गळून पडली. त्यांचा टपकन आवाज ऐकून ससा दचकून जागा झाला. इकडे तिकडे न पहाता काही तरी भयंकर आहे असं समजून धुम धावत सुटला. वारा होता. पाने गळत होती. जिकडे तिकडे टपटप आवाज. ससा भेदरला. अकाश कोसळतय असं वाटून जीव वचावण्यासाठी जीव मुठीत घेऊन ओरडत पळत सुटला. 'पळा पळा, आकाश कोसळतय,' एक कोंबडा सकाळची ड्युटी संपवून दमछाटीसाठी तुरा हलवत ऐटीत उभा होता. पळा पळा ऐकून तोही तुतारी वाजवत धावत सुटला. इतर प्राण्यांनी ओरडा ऐकला. मागचा पुढचा विचार न करता ते धडपडत आरडा ओरडा करीत सैरावैरा बेछूट धावत सुटले. आपली रातपाळी नुकतीच आटोपून आलेली श्वापदे गाढ झोपली होती. ओरड्याने ती जागी झाली व डरकाळ्या फोडीत तीही त्या बचाव मोर्चात सामील झाली. पानं पडताहेत. टपटप वाजतय, प्राणी पळताहेत, एकत्र धमाल उडाली. एका कोल्ह्याने हा सगळा प्रकार पाहिला. मोठा धूर्त. त्यानं वर पाहिले, आजूबाजूला पाहिले. सगळं o.k. लक्षात आलं. वाऱ्यामुळे पानं व डहाळ्या गळत होत्या, त्यांचा तो आवाज. तो ओरडून म्हणाला 'गड्यानो, थांबा घाबरू नका. नुकतच

आकाशवाणीने जाहीर केलय. आकाश कोसळल नाही. ते शाबूत आहे. सर्वांनी वर पाहिलं तर खरच. कसे आपण असे. म्हणून त्यांचच त्यांना हसू आलं ? सगळी गर्दी घरी परतली. अशी ही गोष्ट सशाची आणि माणसाचीही. माणूस असेच करतो. एक पळाला की दुसराही पळतो. माणूस मुळात सशापेक्षाही भित्रा आहे. ससा काळोखाला भीत नाही पण माणूस त्यात शिरायला घाबरतो. सशाला स्वसंरक्षणाची काहीच साधने नसल्या मुळे निसर्गाने त्याला पायाने चपळ आणि मनाने भित्रा केला आहे. यामुळे जिथे वृक्ष जाती तिथे लव्हाळे वाचली, असे होते. छत्रपती शिवाजींच्या डावपेचांचे नीट निरीक्षण केल्यास दिखाऊ भित्रेपणा संरक्षणाचे केवढे साधन होऊ शकते हे लक्षात येईल. मात्र भित्रेपणाचा उपयोग केव्हा, कुठे व किती करावयाचा याचे तारतम्य ज्ञान असावयास पाहिजे. नाहीतर भित्र्यामागे ब्रह्मराक्षस असं होईल व माणूस नेभळट व बावळट होईल. बालके म्हणजे ससेच होत. म्हणून ती जगतात व वाढतात. माणसे देवाला भितात, घाबरतात म्हणून बहुसंख्य लोक पापभीरु असतात. माणसाला पहिला देव आठवला तो भीतीमुळे. अज्ञानी जनांची भक्ति भीतीतून जन्मास येते. भीती चांगली नव्हे खरं, पण तिचाही चांगला उपयोग होऊ शकतो. अर्जुन भ्यायला म्हणूनच ना भगवद्गीता जन्मास आली ? न पेलणाऱ्या परिस्थितीशी तात्पुरते जुळवून घेण्याच्या वृत्तीतून भित्रेपणा जन्मास आला असला तर तो भित्रेपणा त्याच परिस्थितीला बदल-वून धैर्य व पराक्रमाच्या रुपाने उभा राहतो.

## ४०—ठेच

रामलाल हा केळीविक्या होता. तो एका लहान खेड्यात राहत असे. खेडं कसलं पाडाच तो. १०–१५ झोपड्या एका लहानशा टेकडीवर. शेती व थोडिशी बागायत करून जीवन जगणाऱ्या गरीब शेतकऱ्यांचा तो पाडा. रामलालची एक लहानशी बाग होती. त्यात केळी भरपूर होत. इतर फळंही थोडी फार होत. पाटीभर केळी व थोडी फळे घेऊन रामलाल जवळच्या गावी जाई व धंदा करून संध्याकाळी परत येई. रोज सकाळ संध्याकाळ तो ती टेकडी उतरत असे व चढत असे. टेकडी-वरील वाट ही पायवाट होती. तीत जमिनीत रुतून बसलेला एक दगड होता. वाटेत असल्यामुळे नवख्यांच्या पायाला नजर चुकल्यास ठेच लागे. पाड्यातील लोकांची ती पायाखालची वाट असल्यामुळे ते अंधारातही त्या दगडाला टाळून जात. रामलाल त्या वाटेला इतका सरावला होता की तो डोळे मिटूनही जाऊ शके. एके दिवशी रामलालला काही कारणानं गावातून परतण्यास उशीर झाला. असा उशीर त्याला कधी मधी होत असे व अंधारातही तो सफाईने तो दगड टळत असे. पण आज कुणास ठाऊक कसं झालं. त्या दगडावर तो चांगलाच ठेचाळला. त्याच्या अंगठ्याला मोठी जखम

झाली. रामलालला त्याचं काही विशेष वाटलं नाही. पण आपण आज १०–१२ वर्षे येथून जात येत आहोत, तो दगड आपल्या चांगल्या परिचयाचा. असं असता त्याने ठेचाळावे याचे त्याला वाईट वाटले. सवयीप्रमाणे एक हाडसून तो पुढे निघून गेला. असंच आहे, माणसाच्या जीवनाची वाट अनेक टेकड्या चढते व उतरते. ही वाट पायवाटे सारखी असते. सरळ नसते तर सर्पाच्या चालीप्रमाणे नागमोडी असते. शहरातल्या प्रमाणे आसफाल्ट, डांबरी वा सिमेंटचे साफसुफ गुळगुळीत रस्ते जीवनाच्या राज्यात नसतात. सर्वत्र खडबडीत पायवाटा. अनेक वर्षांच्या वापरामुळे त्या मळलेल्या असतात. काही महात्मे नवीन वाटा पाडतात. पण त्याही कालांतराने मळतात. जीवनात ज्यानं त्यानं आपल्या पायानं चालावयाचे असते. गाडी घोडे वा इतर वाहनांची सोय नसते; या वाटांवर दगड धोंडे असतात. काही दगड तर बरेच खोल रुतलेले असतात व त्यांचा थोडासाच भाग वर असतो. त्यामुळे त्यांचे दगडी काळीज दिसत नाही. हे धोक्याचे असतात. जीवनातल्या वाटसरूला केव्हा ठेच मारतील व त्याला तोंडघशी पाडतील याचा भरंवसा नसतो. अगदी आपल्या नेहमीच्या सरावाचे व ओळखीचे असले तरी. म्हणून जीवनात सदैव चौफेर नजर ठेवून अति सावधगिरी बाळगली पाहिजे. आपल्या ओळखीचे, परिचयाचे, स्नेहाचे आहेत म्हणून विश्वासाने बेसावधपणे चाललो तर ऐन वेळी तोंडघशी पाडायला असे दगड समाजात ठिकठिकाणी असतात. त्यांना टाळत टाळत पुढे पुढे जात राहिले पाहिजे.

★

## श्री. जे. एन. बोस यांचे निधन

साईभक्त श्री. जे. एन. बोस ८–२–७८ रोजी कलकत्ता येथील त्यांच्या स्वीन हो स्ट्रीट बालीगंज येथे स्वर्गवासी झाले.

श्री. बोस यांनी कलकत्ता येथे बंगिया सद्‌गुरु साई समाजाची १९४२ साली स्थापना केली. १९५० साली अखिल भारतीय साईभक्तांचा मेळावा कलकत्त्यात भरला होता तेव्हा श्री. बोस स्वागत समितीचे अध्यक्ष होते. श्री. गुणाजींनी इंग्रजीत अनुवादीत केलेल्या श्रीसाईसच्चरित्राचे बंगालीत रुपांतर श्री. बोस यांनीच १९७४ साली केले. बंगालमधे श्रीसाई भक्तीचा प्रचार व बाबांच्या साहित्याचा प्रसार श्री. बोस यांनीच प्रथम केला.



श्री साईनिकेतन मध्ये दिनांक १२ मे १९७८ रोजी नव्याने प्राणप्रतिष्ठा केलेल्या श्रीसाईबाबांच्या संगमरवरी पुतळ्याचे छायाचित्र.

### श्रीसाईनिकेतन मध्ये

# नव्या साईमूर्तीची प्रतिष्ठापना

## नेत्रदिपक समारंभ

शुक्रवार दि. १२-५-७८ रोजी, श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी, मुंबई कार्यालयात श्रीसाईबाबांच्या संगमरवरी मूर्तीची प्रतिष्ठापना, संस्थानचे कोर्ट रिसिव्हर श्री. का. सी. पाठकसाहेब यांचे शुभहस्ते करण्यात आली. वेदघोष व मंत्रोच्चार करून प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी संस्थानचे प्रमुख पुजारी श्री. दिगंबर आव्हाडी व श्री. जोशीशास्त्री शिर्डीहून मुद्दाम आले होते. प्राणप्रतिष्ठेच्या वेळी सिटी सिव्हील कोर्टाचे न्यायाधिश मा. श्री. एन्. के. पारेखसाहेब जातीने हजर होते. अशा तऱ्हेने सनईवाद्याच्या जल्लोषात तसेच शेकडो साईभक्तांच्या उपस्थितीत या सुंदर मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. सदरची मूर्ती भेट म्हणून दिलेले श्री. वसंतभाई संघवी हेही उपस्थित होते. त्याचप्रमाणे बाबांच्या मूर्तीच्या मागील बाजूस संगमरवरी शोभिवंत नक्षीकाम करून, मूर्तीला उठाव आणण्यास मुंबईचे साईभक्त श्री. पराडकर यांनी हातभार लावला. सबंध दिवस श्रीसाईबाबांच्या मूर्तीचे व साईबाबांनी वापरलेल्या जोड्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भक्तांची गर्दी लोटली होती. दिवसभरात निरनिराळ्या साईभक्तांनी बाबांसमोर हजेरी लावली. त्यात श्री. कुलैंकर, गोरेगाव व श्रीमती माणिकताई भिडे यांचा प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो. माध्यान्ह आरती, धुपारती आणि शेजारती यामुळे जणू काही शिर्डी अवतरली आहे की काय असे वाटत होते. शुक्रवारप्रमाणेच शनिवारी देखील शिर्डीचे स्वरूप या वास्तूला आले होते याचे कारण एकच की, वेळेअभावी बऱ्याच साईभक्तांना शुक्रवारी हजर रहाणे अशक्य झाले त्यामुळे ह्या संधीचा लाभ त्यांना अर्थातच शनिवारी घ्यावा लागला.

मुंबईतील साईभक्त मंडळाचे प्रमुख डॉ. किर्तीकर, श्री. शिंदे व श्री. वसंतराव खोपकर यांनी संस्थानचे रिसिव्हर श्री. का. सी. पाठक यांना शाल व श्रीफळ तसेच सौ. इंदिराबाई पाठक यांना खण व नारळ देऊन त्यांचा सत्कार केला.

हा कार्यक्रम विशेष उठावदार करण्यासाठी संस्थान कर्मचाऱ्यांनी जे कष्ट

घेतले, ते खरोखरीच फारच बहुमोल असून त्यामुळे कार्यक्रमाला विशेष शोभा आली. ही गोष्ट विसरता येणार नाही. याचा रिसिव्हर साहेब यांनी प्रामुख्याने उल्लेख करून त्या सर्वांना मनःपूर्वक सुयश चिंतिले.

—कु. रेखा दिघे, दादर



साईनिकेतन मध्ये प्राणप्रतिष्ठा केलेल्या श्रीसाई मूर्तीची पूजा कोर्ट रिसिव्हर श्री. का. सी. पाठक व सौ. पाठक करीत असताना.

# शिरडी–वृत्त

## रामनवमी उत्सव कार्यक्रम–एप्रिल १९७८

श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज शिरडी यांचा श्रीरामनवमी उत्सव सालाबादप्रमाणे शनिवार ता. १५-४-७८ ते १७-४-७८ पर्यंत तीन दिवस थाटात साजरा झाला. दिवसेंदिवस गर्दीचे प्रमाण जास्त वाढत असल्यामुळे संस्थानचे मा. रिसीव्हर श्री. का. सी. पाठकसाहेब यांनी उत्सवाचे तयारीसाठी सर्व खातेप्रमुखांची एक महिना अगोदर सभा घेऊन सर्व कामाचा व खर्चाचा विचार-विनिमय करून कामाची योजना आखून दिल्याप्रमाणे मांडवाचे काम, पाणपोई, संरक्षण, साफसफाई, दिवा-बत्ती लाऊडस्पीकर, कलाकारांची हजेरी, वाजंत्री, सनई, चौघडा, अन्नदान वगैरेची व्यवस्था उत्तमप्रकारे ठेवण्यात आली होती.

**उत्सवाचा पहिला दिवस** :— शनिवार दि. १५–४–७८ रोजी नित्य-कार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरु-स्थानमार्गे श्रींच्या द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी चांदीच्या भव्य सिंहासनावर श्रींच्या फोटोची स्थापना करून साईचरित्र अध्याय वाचनास सुरुवात झाली. दुपारी ४–३० ते सायंकाळी ६–३० पर्यंत ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज नांदेड, (कै. दासगणू महाराज यांचे शिष्य) यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७-३० ते ९ व ९-२० ते ११ वाजेपर्यंत सौ. मधुबाला चावला मुंबई, यांचे गायन झाले. रात्री ९–१५ ते ११–३० पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून काढणेत आली. मिरवणूकीचे वेळी स्थानिक लोकांनी व भक्तमंडळींनी गारुड भारुड कार्यक्रम केले. पुण्याचे श्री. रघुनाथ सांडभोर यांनी नकलांचे कार्यक्रम केले. त्यानंतर वाद्यांच्या व नाचगाण्यांच्या गजरात पालखी समाधी मंदिरात आली व शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस** :— रविवार दि. १६–४–७८ रोजी रविवारची सुट्टी व उत्सवाचा मुख्य दिवस असल्यामुळे पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींच्या फोटोची व साईचरित्र ग्रंथवाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून मंदिरात आली. त्यानंतर कावडी मिरवणुकीचा मोठा कार्यक्रम झाला. शिरडी गावातील भाविक मंडळी व बाहेर गावाहून आलेले साईभक्त कोपरगाव मुक्कामी रात्री जाऊन गोदावरी नदीचे पाणी घेऊन ९ मैल पायी चालत आले. सकाळी ६–३० वाजता मा. रिसीव्हर साहेब यांनी कावडीची पूजा केल्यावर अंदाजे एक हजार कावडींची भव्य मिरवणूक वाजतगाजत गावातून आली.

मंदिराजवळ मिरवणूक आल्यावर सुवासिनींनी कावडीस ओवाळले. नंतर प्रत्येकाने कावडीच्या पाण्याने बाबांच्या समाधीस स्नान घातले. हा कार्यक्रम दोन तास चालला होता.

सकाळी १०-३० ते दुपारी १२-१५ पर्यंत ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज यांचे रामजन्म आख्यान कीर्तन झाले. सायंकाळी श्रींच्या निशाणाची व रथाची मिरवणूक निघाली. रात्री ९ ते सकाळी ६ वाजेपर्यंत उपस्थित कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेऱ्या दिल्या. रात्रभर जागर झाला. मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी रात्री खुले ठेवले होते. गावाबाहेर शोभेचे दारुकाम झाले.

**उत्सवाचा तिसरा दिवस :—** सोमवार ता. १७-४-७८ रोजी नित्य-कार्यक्रमाव्यतिरिक्त ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज यांचे गोपालकाला कीर्तन झाले. दहीहंडी, माध्यान्ह आरती झाल्यावर तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७-४० ते १० पर्यंत श्री. राजकुमार पार्टी (श्री. केतकर) मुंबई यांचे कथ्यक नृत्य झाले. त्यानंतर शेजारती होऊन उत्सव समाप्त झाला.

## राष्ट्रपतींची शिरडीस भेट :—

भारताचे राष्ट्रपती श्री. निलम संजीव रेड्डी यांचे सोमवार दि. १७-४-७८ रोजी खास श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी शिरडीस आगमन झाले. त्यांचे समवेत महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. सादीक अली, सौ. शांती सादीक अली व महाराष्ट्राचे मुख्य-मंत्री श्री. वसंत दादा पाटील हेही उपस्थित होते. मा. राष्ट्रपती यांनी भक्तिभावाने श्रींचे दर्शन घेऊन अभिषेक पूजा मनोभावाने केली व भारताचा उत्कर्ष होवो हीच भावना प्रगट केली. ते दुपारी ११-३० ते १२ पर्यंत मंदिरात होते. मंदिराबाहेर येऊन उपस्थित जनसमुदायाला नमस्कार करून त्यांच्या स्वागताचा त्यांनी स्वीकार केला.

## माननीयांच्या भेटी :—

१) मा. श्री. बी. के. चौगुले, आयुक्त मुंबई महानगरपालिका मुंबई.
२) मा. श्री. शंकररावजी चव्हाण, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र.
३) मा. श्री. भाऊसाहेब वर्तक, माजी मंत्री मुंबई.
४) मा. सौ. शालिनीताई पाटील, (मुख्यमंत्री महाराष्ट्र यांच्या पत्नी)
५) मा. श्री. होमी तल्यारखान माजी मंत्री मुंबई
६) मा. श्री. मधुकरराव चौधरी ( सपत्नीक) महसूल मंत्री महाराष्ट्र.

७) मा. श्री. माथुरसाहेब, डायरेक्टर ऑफ पब्लीसिटी महाराष्ट्र.

८) मा. श्री. रा. सु. गवई, गवई गटाचे अध्यक्ष, महाराष्ट्र.

**हवापाणी :**— शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. दुपारी उष्मा भासतो, रात्री थंड असते.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

**कीर्तन :**— १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली.

**भजन, गायन वादन, नृत्य** १) कु. विमल भा. शिर्के, जळगाव.
२) श्री. बाळासाहेब माळवदकर, पुणे.
३) श्री. जयवंतराव कुलकर्णी, मुंबई.

४) श्री. खाँसाब अब्दुल करिम, मुंबई. ५) श्री. हिरा रा. बाजेवाला, कल्याण. ६) सौ. सुलभा र. जोशी, मुंबई. ७) श्री. वी. बलसारा, कलकत्ता. ८) श्री. धनवाज इन्दोरवाला, ९) श्री. शिवाजी माने, मुंबई. १०) सौ. मंगला बापट, मुंबई. ११) श्रीमती होमाई पंथकी, मुंबई. १२) कु. आबान मेस्त्री, मुंबई. १३) श्री. श्रीराम वि. सातर्डेकर, मुंबई. १४) श्री. रामचंद्र द. वाडेकर, शिरडी. १५) श्री. भगवान ता. भोसले, पंढरपूर. १६) सौ. मधुबाला चावला, मुंबई. १७) श्री. नागवेकर, मुंबई. १८) श्री. अनिल झवेरी, मुंबई. १९) श्रीमती वासंतीताई, २०) सौ. सीता, २१) श्रीमती झवेरी २२) श्रीमती शोभा जोशी, मुंबई. २३) श्री. भागवत रा. सालकर, कोपरगाव, २४) श्री. राम द. दैठणकर, पुणे. २५) सौ. शशिकलाबाई, औरंगाबाद. २६) श्री. अनंतराव राणे, मुंबई. २७) श्री. गोविंद इ. वैशंपायन, नासिक. २८) श्री. सदाशिवराव हाटकर, २९) श्री. रघुनाथ बा. सांडभोर, पुणे. ३०) श्री. टि. के. तळेगावकर, ग्वाल्हेर. ३१) श्री. मनमोहन पा. मसुरकर, मुंबई. ३२) श्री. भोलानाथ रा. समेळ, मुंबई. ३३) राहाता ऑर्केस्ट्रा क्लब, ३४) श्री. ज्ञानेश्वर वागळे, राहाता. ३५) श्री. शेख इनुस, राहाता. ३६) डॉ. बशीर शेख, राहाता. ३७) श्री. शशिकांत नागरे, राहाता. ३८) श्री. बाळासाहेब पारखे, राहाता. ३९) श्रीमती माधुरी मा. ओक, शिर्डी. ४०) सौ. शामला हाटकर, ४१) श्री. आर. एम्. पेटकर, अ. नगर. ४२) श्री. संजीव राणे, मुंबई. ४३) श्री. अशोक ल. जंगम, कोपरगाव. ४४) श्री. सुरेश ल. जंगम, कोपरगाव. ४५) श्री. विलास वि. चव्हाण, कोपरगाव. ४६) श्री. अनंत द. जोशी, कोपरगाव. ४७) श्री. चंद्रकांत नि. मालकर, ४८) श्री. दिनकर स. वाणी, ४९) श्री. ज्ञानेश्वर क्षिरसागर, ५०) श्री. शिवराम फटागले, ५१) श्री. भाऊ साहेब, ५२) श्री. गणेश भागवत, कोपरगाव. ५३) श्री. देशमुख, उमरावती.

५४) श्री. नामदेव ना. भोईर, मुंबई. ५५) सौ. सुलभा रं. डंबरकर, शिर्डी. ५६) सौ. सविता सु. निगरे, शिर्डी. ५७) श्री. शिवराम बिडवे, संगमनेर. ५८) श्री. मुराद गुलामभाई, गणेशनगर. ५९) श्री. मोहनकुमार कांबळे, पुणे. ६०) श्री. सुर्यकांत चिटे, पुणे. ६१) श्री. भिमराव बनसोडे, साकुरी. ६२) श्री. छगन महाराज, शिर्डी, ६३) श्री. राम विलास जोशी, शिर्डी. ६४) श्री. लालचंद, ६५) श्री. रामदेव जोशी. ६६) श्री. कैलास जोशी, ६७) श्री. छोटूलाल जोशी, ६८) श्री. किसन स. खरात, शिर्डी. ६९) श्री. काकडे सर, गणेशनगर. ७०) सौ. पद्मिनी शि. जोशी, मुंबई. ७१) श्री. शिवकुमार जोशी, मुंबई. ७२) श्री. पंढरीनाथ वामफुले, कल्याण. ७३) श्री. सतीश कुणकर्णी, पुणतांबा. ७४) श्री. जगन्नाथ का. भोसले, निर्मळपिंपरी. ७५) श्री. ज्ञानोबा ता. वाडेकर, शिर्डी. ७६) श्री. नविन श. दोंदे, मुंबई. ७७) श्रीमती शैला आचार्य, मुंबई. ७८) श्री. प्रकाश वेळनेकर, मुंबई. ७९) श्री. कोंडीबा किसन, नांदेड. ८०) श्री. रामदास पवार, ८१) श्री. बाबुराव तु. कांबळे, बुलढाणा. ८२) श्रीमती पार्वतीबाई मुंडे, कळमवाडी. ८३) श्री. ठाकूर चांदूसिंग तु. खेडकर. ८४) श्री. रामानंद स्वामी, वेळगाव. ८५) श्री. शिवाजी श. गुरव, समशेरपूर. ८६) श्री. विश्वनाथ श. केरेकर, लक्ष्मीवाडी. ८७) श्री. वसंत मो. पवार, पुणे. ८८) श्री. शेख नबाब उ. पटेल, अस्तगाव. ८९) श्री. चौखेलाल, रायपूर. ९०) श्री. वसंत दा. सामंत, ९१) ह. भ. प. तुकारामबुवा आजेगावकर, परभणी. ९२) ह. भ. प. भांडारकवडे, पंढरपूर. ९३) श्री. भास्कर पळणीटकर, ठाणे. ९४) श्री. रामचंद्र शि. शेटये, डोंबिवली. ९५) श्री. एस. जी. म्हात्रे, डोंबिवली. ९६) श्री. सावदा महाराज, बारामती, ९७) श्री. जगदंबा प्रसाद शर्मा, वांद्रा. ९८) श्री. सुनिल जाधव, ९९) श्री. सुरेश जाधव, १००) श्री. किशोर देशमुख, मुंबई. १०१) श्री. रघुनाथ नागरे, शिरडी. १०२) कै. तुकाराम खेडकर तमाशा मंडळसह श्री. पांडुरंग मुळे, पुणे. १०३) श्री. शंकरराव गोलतकर, मुंबई. १०४) श्रीमती ललिताताई शं. गोलतकर, मुंबई. १०५) श्री. अनंत भि. पोळेकर, मुंबई. १०६) श्री. विजय मांबरेकर, मुंबई. १०७) सौ. पुष्पा न. ओसवाल, मुंबई. १०८) श्री. नंदू शा. शिराळे, मुंबई. १०९) श्री. रघुनाथ कृ. कारखानिस, कोपरगाव. ११०) सौ. जया नटराजन, दिल्ली. १११) श्री. ज्ञानेश्वर रा. वैद्य, शिरडी. ११२) श्री. बालयोगी ओतुरकर महाराज, येवला. ११३) श्री. मीरा भजनी मंडळ, वरळी मुंबई. ११४) श्रीसाई भजन मंडळ, नानपुरा सुरत.

※

# नमन तुजसी साईनाथा

नमन तुजसी साईनाथा
दीन अनाथांच्या नाथा,
वाटतसे कृतार्थता
चरणीं ठेवियसां माथा
कुठुनिया आलासी तूं
कवण तुझी माता-पिता,
नोहे कशाचाच कुणा
जगामार्जी थांग पत्ता
नाही जात, नाही पंथ
निर्गुण तूं परब्रह्म
निरंजन, निर्विकार
असशि आनंदाचे धाम
तुझ्या चरणाच्या स्पर्शे
शिरडीस लाभे क्षेत्रपण
परिसाच्या संगे बने
जैसे लोहाचे सुवर्ण
तुझ्या दिव्यत्वाच्या पायीं
शिरडीचें झाले तीर्थ
तुझ्या पायीं लोळताति
मोक्ष-मुक्तिचे सुगम पंथ
जीवनाच्या वाटेवर
साईनाथ कल्पतरु
भवदुःखे पीडिलेल्या
तव कृपेचा आधारु
म्हणुनिया तव पदीं
वृत्ति लीन झाली तरी,
तुझ्या स्मरणाची सदा
वाजवी मी एकतारी

—डॉ. शान्ताराम टिपणीस, साकुरी

# साई लाज रखो !

साई रख लो मेरी लाज !
सदा सदा मैं शरण तुम्हारे, तुम केवल गरीब नवाज़ ।
पतितपावन तुम हो साई, सुन लो दर्द भरी आवाज़ ।
तुम बिन मेरा कोई नही है, पार लगा देज़ हाज ।
दुःख से पिढित मन मेरा है, कर दो अपना काज ।
गुंडदास पर कृपा तो कर दे, मुक्तिदान दे दे आज ।
साई रख लो मेरी लाज ।

—प्रा. गुंडेराव पटवारी "साहित्य रत्न"
यन्. यफ्. जे. कॉलेज, बिदर
(कर्नाटक) ५८५४०१.

## — मार्ग —

हवास मज तू हवास सद्गुरु साईनाथा ।
उद्धराया जिवन ज्योत हवास मज तू हवास साईनाथा ॥

नादान मी अज्ञान बालीका ।
परि विसरू नको मज साईनाथा ॥

भिक मागते कोणी पत्थरीते ।
कोण दिन होईल, दाखवा दाखवा मार्ग म्हणते ॥

सारे म्हणती मार्ग फार कठीण ।
तू असशी की अजाण ॥

या मार्गी असती कांटकुटे फार ।
तुज न झेपणार हा भार ॥

परि मज न वाटे संत महिमा अगाध ।
वास्तव संतांशी घालीते साद ॥

प्रभु भेटण्याला काय करू सांगा ।
मार्ग मज तुम्ही हा दावा ॥

इंदू विनविते सुमनाने ।
दर्शन घडूदे साई तव कृपेने ॥

—डॉ. इंदू नाईक
सीताकुंज, बॉंबे पूनारोड, लोनावळा

# ॥ श्री साईस्तवन ॥

धावा हे प्रभू श्रीसाई
आता भेटण्याची करा घाई ॥
आस लागली तुझ्या दर्शनाची
हृदयात बैसली मूर्ती तुमची
मनात चिंतन साई साई
आता भेटण्याची करा घाई ॥ १ ॥

तुम्हीच माता तुम्हीच पिता
तुम्हीच अमुचे त्राता
करीतो एक मागणे आता
रोज मुखी राहो नाम साई
आता भेटण्याची करा घाई ॥ २ ॥

—उदय गजानन नेवगी
मालभाट, मडगाव-गोवा.

★

# — साई दयाघन —

शिरडीक्षेत्र पुण्यधाम । जिथे साई दयाघन ।
साईबाबा परमेश्वर । आम्ही त्यांचीच लेकरं ।
धुनि माता द्वारकामाई । भक्तांसी अभयी देई ।
साईबाबा मायबाप । दुःख क्लेश जाळी, पाप ।
साईनाथ माझे आई । मन चरणी धांव घेई ।
साईबाबा कृपा धन । आम्ही भक्त पुण्यवान ।
कृपाळु बा साईनाथा । भक्त चरणीं ठेवित माथा ।
साई साई वदतां वाचे । मूळ जाईल पापाचें ।
साई चरणी चित्त धरा । चुकेल चौऱ्यांशीचा फेरा ।
साई नाम जपता नित्य । साध्य सर्व मनोरथ ।
जया मनी जैसा भाव । तया पावे साईदेव ।
साईबाबा विश्वंभरा । तव हृदयी येवो करूणा ।

—श्रीमती शंकुतला मुंडले
जामदारमंदिर, पितृछाया, आर. एम्. एस. बिल्डींग,
महाल, नागपूर.

# श्री साई महीमा

(चाल :— श्री सद्गुरू बाबासाई, तुज वाचून आश्रय नाही.... )

श्री सच्चिदानंदा साई। धाव घेतली तुमच्या पायी या जगी ॥ ध्रृ ॥
तू या त्रिलोकीचा निर्माता,
रंजल्या गांजल्यांचा दाता, ॥ श्रीधरा ॥ १ ॥

तुझ्या हातात जादू भारी,
तू भल्या बुऱ्यांना तारी ॥ इश्वरा ॥ २ ॥

तुझी किमया अगाध सारी,
तू दिसे अनेकावतारी ॥ परमेशा ॥ ३ ॥

शिर्डीत द्वारकामाई'
वास तुझारे ठायी–ठायी ॥ श्रीशंकरा ॥ ४ ॥

तुझ्या लिला अनंत कोटी,
फिरू दे हात प्रेमळ पाठी ॥ योगीराज ॥ ५ ॥

तू सर्वही व्यापक देवा,
अनंता, देवाधिदेवा ॥ गुरूवरा ॥ ६ ॥

तुझ्या समाधीचा तो 'स्पर्श'
सर्वांना करी आकर्ष, ॥ शिर्डीला ॥ ७ ॥

–श्री. आर. जी. डुबल
टागोर नगर विक्रोली मुंबई नं. ८३

## विविधरूपात साई

मंगलदायक श्रीगजानन, शिरडी ग्रामी मज दिसला ।
गोकुळवासी देवकीनंदन, श्रीहरी मी देखिला ।।
शेषशायी भगवान विष्णू तो शिरडीस नेत्री मज दिसला
दंडकमंडलूधारी नाथ गुरु, शिरडी ग्रामी मज गमला ।।
गिरिजानायक भवभयहारक, शिवशंभो मी देखिला ।
उभा राहिला कर ठेवूनी कटी, पांडुरंग मी देखिला ।।
जानकीजीवन तो रघुनंदन, शिरडीतची मी देखिला ।
नतमस्तक जो रामापुढती, तो हनुमान मी देखिला ।।
विविध रूपे प्रभु अवतरे, परी तो साई मज ठावे ।
तरी मज वाटे शिरडीस जाऊन, त्या त्या रूपा आठवावे ।।

—उषा प्र. अधिकारी
सावित्री भुवन, बंदर रोड, रत्नागिरी

★

## तोचि सद्गुरु साई

षड्रिपूंवरी मात जगाची
तोचि सद्गुरु साई
समदृष्टीने संतदर्शनी
पावन हो लवलाई ।। ध्रु ।।
सद्भक्तीच्या सोज्वळ वाटा
अलभ्य लाभा नयेचि तोटा
महद् भाग्ये कृपाप्रसाद जया
अपरोक्ष ज्ञाने होई ।। १ ।।
सर्वांतरी मी नांदे एक साईनाथ
नामजपाने हृदयी प्रगटे साक्षात्
शिवराम वंदितो श्रीनाथ साई
चरणी ठेवोनिया डोई ।। २ ।।

– श्री. शिवराम बुवा राणे
मु. पो. ओझरम पिंपळवाडी, व्हाया तरेळे
ता. कणकवली जि. रत्नागिरी

# तूच त्राता साईनाथा

साई मज दाखवी साक्षात्कार
जन्म-मृत्यूचा विचार करिता
दुःख भरलेले हे विश्व पहाता
ना कळे, हा देव कि,
दैवाचा अविष्कार ? ॥ १ ॥

कां आलो, मी या जगती ?
आणि जायाचे कोण्या रिती ?
कशासाठी हा जीवन खटाटोप ?
असे कोण, या नाट्याचा सूत्रधार ? ॥ २ ॥

कधी वाटे, ही किमया परमेशाची
कधी वाटे, ही रीतच निसर्गाची
मन वेडे, शोधू लागे, जागा विधात्याची
ध्वजा दिसे तव प्रेमाची, अन् घडे चमत्कार ॥ ३ ॥

फळाची ना अपेक्षा करिता
कार्य करित रहा सांगे गीता
संसारी परी कसे शक्य हे साईनाथा ?
मी चालतो, अन् पुढे दिसे अंधःकार ॥ ४ ॥

बुवा बाजीची ढोंगे पहाता
अन् फसवणुकीचे प्रकार सहाता
वाटे कोण या जगास त्राता ?
संभ्रमातील या असंख्य अर्जुना
दाखवी तू सत्याचा अधिकार ॥ ५ ॥

—सुधाकर जोशी
गावडे कॉलनी, चिंचवड, पुणे

# आता सावरी सद्गुरु साई

या भवतापे तडफड होई
आता सांवरी सद्गुरु साई ॥ धृ ॥

काम क्रोधे बहू व्यापलो
षड्ही रिपूंनी अति शिणलो
या साऱ्यांशी झगडू कैसा ?
आता सांवरी सद्गुरु साई ॥ १ ॥

गोडी मजला स्त्री पुत्रांची
आशा जागली तशी पैशांची
या लोभातून सूटूं मी कैसा ?
आता सांवरी सद्गुरु साई ॥ २ ॥

कीर्ती आवडे मजशी भारी
कामिनी कांचन प्रेम नावरी
या जाळयाला तोडू कैसा ?
आता सांवरी सद्गुरु साई ॥ ३ ॥

सौख्यासाठीं तडफड फार
अंगी मातला द्वेष पुरेपुर
तुझ्या जवळी मी पोहचू कैसा ?
आता सांवरी सद्गुरु साई ॥ ४ ॥

या मायेने शिणलो मी बहू
जाऊ कुठे अन् कुठे मी पाहू ?
धांव धांव रे सत्वरी येई
आता सांवरी सद्गुरु साई ॥ ५ ॥

— सुरेश शां. सातपुते
लालबाग, मुंबई १२

## मानस पूजा

# श्री सद्गुरु साईनाथांची

सद्गुरुनाथा, साईनाथा अनाथांच्या नाथा ॥
दीन अनाथ मी भक्त आपुला ठेवी पदीं माथा ॥ ध्रु ॥
अभिषेकास्तव नसे करी मम पवित्र गंगोदक ॥
गंगा यमुना डोळ्या मधल्या हेच उष्ण उदक ॥ १ ॥
स्नानोत्तर तव अंग पुसाया नसे वस्त्र रेशमी ॥
करकमलाने पुसेन आपुला पुण्यदेह स्वामी ॥ २ ॥
नसे कस्तुरी नसेही केशर अंगी लाविण्या उदी ॥
भाव भक्तीचा थोडा परिमल आहे मम गाठी ॥ ३ ॥
पत्रपुष्प ना तुळस मंजिरी नसे बिल्वपत्र ॥
वाहिन नाथा कमल फुलापरी चरणी दोन नेत्र ॥ ४ ॥
नैवेद्यास्तव नसे मजकडे मधु मधूर मेवा ॥
नित्य देशी जी मला भाकरी तीच आणिली देवा ॥ ५ ॥
प्राण ज्योत जी अंतरी तेवत तिने करीत आरती ॥
कंटकमय हा मार्ग चालता मिळू दे तव संगती ॥ ६ ॥

—विनायक महादेव देशपांडे
५९४, नारायण पेठ, पुणे ३०.

# — साईगाथा —

मन गाई गुण, तुझे साईनाथा
धाव पाव आता, अनाथाच्या नाथा ॥ध्रु० ॥

क्षेत्र शिर्डी आहे, तुझा दरबार
जोही आला येथे, केला तू उद्धार
जोडुनिया कर, चरणी तुझ्या माथा ॥ १ ॥

रंकांचा तू राव, दीनांचा कैवारी
रंक–राव येती, नित्य तुझ्या द्वारी
तुजविन नाही, आता कुणी त्राता ॥ २ ॥

वाहे तुझ्या द्वारी, भक्तीची रे गंगा
निनादूनी सांगे, खंजिरी मृदुंगा
थोर आहे किती, साईनाथ गाथा ॥ ३ ॥

नित्य वसो देवा, मनी तुझी मूर्ती
सेवेसाठी तुझ्या, द्यावी मला स्फूर्ती
वाहतो "अमन" भावमाळ आता ॥ ४ ॥

— श्री. डी. बी. जगत्पुरीया "अमन"
बी. एस्सी. बी. एड्. साहित्यालंकार
मु. पो. शिरूड
ता. जि. धुळे

# वाघाच्या निर्वाणाचें दृश्य व त्यापासून घ्यावयाचा बोध

— श्री अनंत जयदेव चितांबर, अहमदनगर

श्री साईबाबांच्या लीलांचें वर्णन साईभक्त अत्यंत आनंदानें व भक्तिभावानें करीत असतात ही गोष्ट सर्वश्रुत आहे बाबांना आपण संत मानतों. पण बाबा संतांचेही संत आहेत. योगेश्वर आहेत, सर्व व्यापक प्रभु आहेत.

श्री साईबाबांसारख्या विभूति केवळ चमत्कार करण्यासाठींच अवतरत नसतात, तर त्यांच्या मूर्तिमंत कारुण्याचा जो आविष्कार दृष्टिगोचर होत असतो त्यास आपण चमत्कार असें नांव देतों. संत एकनाथ महाराजांनीं याविषयीं उत्कृष्ट वर्णन केले आहे, ते म्हणतात —

"ते पाहती ज्यांकडे । त्यांसि उणे भवसांकडे ॥
परब्रह्म ठेविलें पुढे । निजनिवाडें उल्हासें ॥
तेथ साधन चतुष्ट सायास । न पाहती शास्त्रचातुर्यविलास ॥
एक धरिला पुरे विश्वास । स्वयें प्रकाश ते करिती ॥

हा प्रकाश कोणता ? तर्क चालत नाहीं, मति कुंठित होते. अज्ञानाची झांपड नाहींशीं होत नाहीं. असें कां व्हावे ? तर त्याबद्दल एकनाथ महाराज म्हणतात त्याप्रमाणें —

"म्हणोनि विश्वासेविण नाडला । जगु ठकला विकल्पें ॥

ह्यांत त्यांचें उत्तर आहे. आमची बुद्धि विकल्पांच्या गुंडाळ्यानीं इतकी अस्थिर झालेली असते कीं त्यांतून आमची सुटका होत नाहीं. येथें दृढनिश्चयपूर्वक साधक होण्याची जरूरी आहे. ज्ञानप्राप्तीची तळमळ सद्गुरुशिवाय कोण शांत करणार ?

वरील उपोद्घाताचे कारण एवढेच की, साईबाबांच्या चरित्रांतील एका प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टीपासून मननपूर्वक बोध घ्यावयाचा आहे. एके दिवशीं सकाळीं नित्याप्रमाणे बाबा मशिदीत कठड्याला टेकून बसले असतानां, दरवेश्याने आणलेल्या एका वाघानें, मशिदीच्या पायरीवर डोके ठेवून बाबाना नमस्कार केला व तात्काळ तो वाघ गतप्राण झाला. ही ती घटना. हे दृश्य

मी स्वतः माझ्या डोळ्यांनी द्वारकामाईत पाहिलेले आहे. मी त्यावेळीं ६/७ वर्षांचा असेन त्यावेळीं आमचे आई वडील व आम्ही मुले शिर्डीतच राहात होतो. त्या बालवयात मनन होणे शक्य नव्हते. आता याबाबत मला खालील विचार सुचून ते बाबाच प्रकाशित करीत आहेत. त्यापासून बोध घेण्याची बुद्धि बाबाच देत आहेत.

( १ ) मला एवढ्या बालवयांत वरील घटना पाहण्यास बाबांनीं प्रत्यक्ष हजर ठेवले हे मी माझे परमभाग्य समजतो, त्याचप्रमाणे ही बाबांची मजवर कृपा समजतो.

( २ ) वाघाचे प्राणोत्क्रमण त्याने बाबांचें दर्शन घेतांच व्हावे याचा अर्थ त्या प्राण्यावर बाबानीं आपली कृपादृष्टी करून मागील जन्मीच्या त्याच्या पुण्याच्या बळावर त्यास ह्या जन्मी दर्शन देऊन एक तर मुक्ति देऊन उद्धार केला अगर त्यास शुचिर्भूत अशा कुळांत थोर मनुष्याच्या जन्मास त्याच्या राहिलेल्या वासनापूर्तीसाठी व पुढील सद्‌गतीसाठीं, घातले असेल.

( ३ ) वाघाने दरवेशाच्या साखळदंडाच्या बंधनांत शिर्डीस येऊन, सद्‌गुरुचे दर्शन त्यास ह्या जन्मांत मिळावे, हा योगायोग सद्‌गुरुसेवेनें निर्माण केलेले त्याचे प्रारब्ध दर्शवितो.

( ४ ) वाघाच्या प्राणोत्क्रमणाच्या वेळीं कोणत्याही प्रकारच्या शारीरिक वेदना ( तडफड वगैरे ) मुळींच प्राप्त न होता अगदी शांतपणे मानेसह देह जमिनीवर पडून, निश्चेष्ठ होऊन त्याचे प्राणोत्क्रमण झाले. त्याअर्थी बाबानीं कृपादृष्टीने, त्याने कलेवर सोडताना त्यास देहांतीची व्याकुळता मुळींच होऊं दिली नाही. ही बाबांची त्या वाघावर केवढी कृपा ! त्या वाघाने मागील कोणत्या जन्मी कोणते पुण्य केले असेल ? पण जन्म मात्र वाघाचा प्राप्त झाला ! तरी पण सद्‌गुरु-दर्शन होताच कलेवर सोडून गेला !

( ५ ) धन्य तो पशुजन्मी व्याघ्र, की त्यास सद्‌गुरु भेटून सद्‌गति मिळाली !

( ६ ) धन्य धन्य ती भक्तांचा ( कोणत्याही जन्मीचा असेना ) उद्धार करणारी सद्‌गुरु साई माऊली !

**वरील विचारानंतर अंतःकरणांत होणारा बोध :—**

भगवंताची कृपा कशी होते ह्याचे वरील प्रत्यंतर समक्ष देऊन, यथाकालाने सद्‌गुरु गुह्य ज्ञान प्रकट करतात.

**गीतेतील श्लोक —अध्याय ८ वा श्लोक १४ वा —**

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥

यावरील श्रीज्ञानेश्वरीतील ओव्या खाली देत आहे. त्यामुळे बोधाचे स्पष्टीकरण व्हावे.

तें ऋणवैपण देखोनि आंगीं । मी आपुलीयाचि उत्तीर्ण त्वालागीं ।
भक्ताचिया तनुत्यागीं । परिचर्या करी ॥ ३१ ॥
देह वैकल्याचा वारा । झणें लागेल या सुकुमारा ।
म्हणोनि आत्मबोधाचें पांजिरा । सुयें तयातें ॥ ३२ ॥
म्हणोनि देहांतीचें सांकडे । माझिया कहींच न पडे ।
मी आपुलीयाते आपुलींकडे । सुखेंचि आणि ॥ ३४ ॥
वरवील देहाची गंवसणी फेडुनी । आहाच अहंकाराचे रज झाडुनी ।
शुद्ध वासना निवडुनी । आपणपां मेळवी ॥ ३५ ॥
ऐसे जे नित्ययुक्त । तयांसी सुलभ मी सतत ।
म्हणऊनी देहांती निश्चित । मीचि होती ॥ ३९ ॥

श्रीसद्गुरु साईबाबांच्या चरणी नित्ययुक्त असावे ही प्रार्थना बाबानां करून हा लेख त्यानांच अर्पण करतो.

## — खुलासा —

पूज्य राधाकृष्ण स्वामीजी यांनी बंगलोर येथे स्थापन केलेल्या "साई स्पिरीच्युअल सेंटर"ला यंदा पंचवीस वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने त्यांनी तेथे श्रीसाईबाबांचा पूर्णाकृति संगमरवरी पुतळा अक्षय्य तृतीयेच्या सुमुहूर्तावर दि. १२–५–७८ ला बसविला. त्याचे छायाचित्र मुखपृष्ठावर छापले आहे. "साई निकेतनमधील श्री साईबाबा मूर्ती" हा त्या चित्राखालील मजकूर नजरचुकीने पडला आहे. दादर येथे श्री साई निकेतनमध्ये ज्या नव्या संगमरवरी पुतळ्याची प्राणप्रतिष्ठा दि. १२–५–७८ ला करण्यात आली त्याचे छायाचित्र पृ. ३० वर आहे.

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | रु. पै. |
|---|---|
| (१) श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १२—०० |
| (२) श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६—२५ |
| (३) श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ८—५० |
| (४) श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७—२५ |
| (५) श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ४—२५ |
| (६) श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०—०० |
| (७) गुजराती पोथी (शरणानंद) | ४—२० |
| (८) श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०—२० |
| (९) श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०—३० |
| (१०) दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०—२५ |
| (११) सगुणोपासना, (मराठी) | ०—२५ |
| (१२) सगुणोपासना, (गुजराती) | ०—२० |
| (१३) श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २—०० |
| (१४) साईलीलामृत, (मराठी) | ४—७५ |
| (१५) सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | ३—०० |
| (१६) साईबाबा अवतारकार्य, (अ. द. खोड) | २—५० |
| (१७) शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५—०० |
| (१८) शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | २—०० |
| (१९) मुलांचे साईबाबा, (मराठी) | ०—७५ |
| (२०) मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १—०० |
| (२१) चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १—२५ |
| (२२) मुलांचे साईबाबा (तेलगु) | १—१० |
| (२३) बच्चोंके साईबाबा ( हिंदी ) स. चंद्रचकर | ०—७५ |
| (२४) साई कीर्तनमाला, (मराठी) | ३—२५ |
| (२५) साई दी सुपरमन, के. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ३—२५ |
| (२६) श्रीसाई रुद्राध्याय, (मराठी) | ०—२५ |
| (२७) श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०—१५ |
| (२८) गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०—१० |
| (२९) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, ( मराठी व इंग्रजी ) | |
| वार्षिक वर्गणी, | ६—०० |
| प्रत्येक प्रत | ०—६० |

Regd. NO. MH/BYE/26


# साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( होमिओपाथिक )

## सर्व धर्मियांकरिता खुले

कृपया या संधीचा जरूर लाभ घ्यावा.

वेळ : रोज सकाळी १०-३० ते १२-३० सायंकाळी ४-३० ते ६-३०

रविवार व काही विशिष्ट सुट्टीचे दिवस सोडून

आकार : दर दिवसास २५ पैसे

नवीन पेशंटसाठी ५० पैसे नोंदणी फी आकारली जाईल.

स्त्रियांसाठी खास स्त्री डॉक्टरांची सोय

## साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( शामदासानी फौंडेशन )

नवजीवन हौसिंग सोसायटी,

ब्लॉक नं. ३, रूम १०४,

लॅमिंग्टन रोड, मुंबई ४०००० ८


मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–३१. संपादक व प्रकाशक : श्री. का. सी. पाठक, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.